www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी




मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ | अंक : 290 | शनिवार दि. 05 जुलै २०२५ | किंमत : 2 रु | पृष्ठ : ४

# चंदुकाका सराफ प्रा.लि. यांच्या पनवेल स्टोअरचा शानदार शुभारंभ संपन्न

## शुभारंभानिमित्ताने १ महिंद्रा थार व ३ ज्युपिटर बाइक्स जिंकण्याची संधी! पनवेलवासीयांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी** – देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई व कोकण यांना जोडणाऱ्या आधुनिक, विकसित, संपन्न अशा पनवेल शहरात १९८ वर्षांची सुवर्णपरंपरा लाभलेली चंदुकाका सराफ प्रा.लि.सुवर्णपेढीचा मोठया उत्साहात शुभारंभ संपन्न झाला. यावेळी चंदुकाका सराफ प्रा. लि.यांच्या सुवर्णदालनाचा शुभारंभ सुप्रसिध्द सिने अभिनेत्री सायली संजीव, पनवेलचे माजी खासदार मा. श्री. रामशेठ ठाकूर, पनवेलचे आमदार मा. श्री. प्रशांत ठाकूर यांच्या शुभहस्ते व मा.खासदार श्री. श्रीरंग बारणे, जे. एम. म्हात्रे इन्फ्रा प्रा. लि. चे संचालक मा. श्री. प्रितम म्हात्रे, पनवेलच्या महापौर सौ. कविताताई चौतमोल, आमदार श्री. विक्रांत पाटील, माजी आमदार श्री. बाळाराम पाटील, रायगड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष मा. श्री. महेंद्रशेठ घरत, आमदार मा. श्री. महेश बालदी, ॲड. श्रीमती वृषाली वाघमारे, मा. श्री. विलास कोठारी, मा. श्री. विश्वतेज साळवी, श्री. रविंद्र घरत, सौ. चारूशिला घरत, सौ. मनिषताई ठाकूर, श्री. मोतीलालजी जैन व चंदुकाका सराफ प्रा. लि. चे चेअरमन श्री. किशोरकुमार शहा, संचालक सौ. नेहा किशोरकुमार शहा व मॅनेजिंग डायरेक्टर कु. सम्यक किशोरकुमार शहा, डॉ. अनिकेत कुंभोजकर, डॉ. प्रियंका कुंभोजकर, श्री. निकेत फडे,


चंदुकाका सराफ प्रा. लि. यांच्या पनवेल शाखेच्या शुभारंभ प्रसंगी सायली संजीव शेजारी श्री. किशोरकुमार शहा, कु. सम्यक शहा, सौ. नेहा किशोरकुमार शहा, श्री. महेंद्रशेठ घरत, श्री. विश्वतेज साळवी, डॉ. अनिकेत कुंभोजकर, डॉ. प्रियंका कुंभोजकर, श्री निकेत फडे, सौ. सेजल पाटील व अन्य मान्यवर.

पान २ वर

# दृष्य सत्य

## जनतेच्या नजरेतून शासनाच्या दरबारात

## लाखोंचा खर्च. पण संडास कायम बंद!




**स्थान: मुरुड, दत्तनगर – वॉर्ड क्र. १**
**प्रतिनिधी: मोहम्मद पिंजारी, लातूर**

मुरुडच्या भुसार बाजारात शासनाने लाखो रुपये खर्चून स्वच्छतागृह बांधले, पण डागडुजीच्या अभावामुळे अनेक वर्षांपासून ते बंद आहे. महिलांना आणि व्यापाऱ्यांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. परिसरात अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले असून, स्थानिक प्रशासन दुर्लक्ष करत असल्याची व्यापाऱ्यांमध्ये चर्चा आहे.

**मुरुड भुसार बाजारातील स्वच्छतागृह रखडले; महिलांना व व्यापाऱ्यांना मनस्ताप, परिसरात घाणच घाण!**

# येरोळ परिसरावर जोरदार पावसाची प्रतिक्षाच

## पाऊस नसल्याने कोवळ्या पिकांनी टाकल्या माना...

**दैनिक युवक आधार**
**प्रविण तांबोळकर लातुर**
**शिरूरआनंतपाळ :** जुन महिण्यामध्ये एकही मोठा पाऊस पडला नाही. त्यामुळे रिमझीम पावसातच गेला. यामुळे या परिसरातील नदी नाले ओढे वाहीले नसल्याने तलावात पाणी पातळीत वाढ झालेली नाही. जमीनीत ओल नसल्याने अनेक शेतकऱ्यांना दुबार तिब्बार पेरणी करावी लागली. तर काही शेतकऱ्यांनी पातळ झालेल्या सोयाबीनमध्ये महिला मजुराकडुन टोबन लावन करावे लागले. उगवलेल्या कोवळ्या पिकांना आता मोठ्या पावसाची गरज असल्याचे शेतकरी सांगत आहेत. जुन महिण्यात पडलेल्या पावसावर शेतकऱ्यांनी सोयाबीन व तुरीची पेरणी केली. परंतु उगवलेल्या कोवळ्या पिकांना रिमझीम पावसामुळे नव संजीवनी मिळत असली तरी हलक्या रानावरिल पिकाच्या मुळ्या जमीनीत ओल नसल्यामुळे कमजोर होत आहेत. मोठा पाऊस पडल्यास कोवळ्या पिकाच्या मुळीवर मातीचा भर पडल्याने पिकाला मजबुती येत असल्याचे वयोवृध्द शेतकरी सांगत आहेत. येरोळ गावालगत असलेल्या पांढरवाडी लघु प्रकल्प गेल्यावर्षी मृग नक्षत्रात पडलेल्या पहिल्याच पावसात सत्तर टक्के भरला होता. परंतु यावर्षी या लघु प्रकल्पात पन्नास टक्केच पाणी साठा शिल्लक आहे.



यावर्षी मृग नक्षत्रात मोठा पाऊस न पडल्यामुळे नदी नाले ओढे भरुन वाहीले नाहीत. त्यामुळे पांढरवाडी लघु प्रकल्पात पाणी पातळीत वाढ झाली नाही. त्यामुळे तलावात मच्छीबीज सोडण्यात आले नाहीत. मच्छीबीज लवकर सोडले तर ते पुर्णपणे मोठे होतात. पाऊसच नसल्याने आमचे आर्थीक नुकसान झाले असल्याचे मच्छीमार व्यापारी नुरखा पठाण यांनी सांगितले.

---

रिमझीम पावसामुळे पिकांना तात्पुर्ती नवसंजीवनी मिळत असली तरी पिकाची वाढ पहाता त्यांना जोरदार पावसाची गरज आहे. पाऊस नाही पडल्यास पिकावर व उत्पादनावर परिणाम होईल. यामुळे शेतकऱ्यांना जोरदार पावसाची प्रतिक्षा असुन मायबाप पंढरपुरचा विठोबा किमान आषाढी एकादशीला तरी मोठ्या पावसाचा वर्षाव करील अशी आपेक्षा आहे.

**विश्वनाथ साकोळकर शेतकरी येरोळ.**

# उमराळा गावात महावितरण चा भोंगळा कारभार.शेतात पडले लाईनचे तार.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**
वाशिम जिल्ह्यामध्ये वाशिम तालुक्यात उमराळा येथे शेतामध्ये जाणारी लाईन वारंवार तार तुटून अपघात होत आहेत. तीन वर्षाच्या अगोदर उमराळा येथे याच लाईन मुळे चार जनावरे म्हशी किंमत एक लाख रुपये एक म्हैस असे चार जनावरे तीन वर्षाच्या अगोदर याच जागेवर दगावली आहेत. तसेच गावातील शेतमजूर महिला व कष्टकरी शेतकरी शेतीतील मालक कदाचित हे लाईनचे तार एखाद्या शेतकऱ्याच्या अंगावर पडले तर एखादी अनुचित घटना घडली तर त्याला महावितरण जिम्मेदार अशी उमराळा गावच्या शेतकऱ्यांमध्ये चर्चा तरी महावितरण कर्मचारी व वरिष्ठ अधिकाऱ्यांना शेतकऱ्याची विनंती आहे की त्वरित पन्नास वर्षाच्या अगोदर ओढण्यात आलेली लाईन तार महावितरण कर्मचाऱ्यांनी व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ दखल घेऊन नवीन लाईनचे तार बसवण्यात यावे.



# परतूर पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक सुदाम भागवत यांना प्रोफेसर्स फोरमची भेट....

**दैनिक युवक आधार**
**परतूर- जालना (अशोक ठोके)**
परतुर पोलिस स्टेशन येथे नव्याने रुजु झालेले पोलिस निरीक्षक सुदाम भागवत यांची पुष्पगुच्छ देऊन प्रोफेसर्स फोरमने सदिच्छा भेट घेतली.प्रोफेसर्स फोरम चे प्रवर्तक प्रा. सिद्धार्थ पानवले यांची परतुर परिसरातील महाविद्यालयामध्ये ॲण्टी इव-टीजिंग प्रोग्राम(छेडछाड़ विरोधी प्रतिबंध)प्रभावीपणे राबविण्याची मागणी केली.तसेच दुचाकीस्वाराच्या अनियंत्रित वेगामुळे अनेकांनी आपला जीव गमावलेला आहे या संदर्भाने शहरातील मुख्य रस्त्यावर सुसाट भरधाव वेगाने दुचाकी चालविणाऱ्या कुमार वयीन युवकांच्या वाढत्या वेगाला आवर घालण्याची पोलिस निरीक्षक सुदाम भागवत साहेबांना विनंती केली. या प्रसंगी प्रोफेसर्स फोरम चे सदस्य प्रा. किरण मगर, प्रा. कुशल मगर उपस्थित होते.








## आषाढीवारीचे औचित्य साधून पिण्याचे पाणी उपलब्ध होण्यासाठी सद्‌गुरु श्री श्री साखर कारखान्यातर्फे आलेल्या टँकरचे वैद्यकीय अधिकारी विलास जाधव यांचे हस्ते पूजन

**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी**

**(रघुनाथ देवकर)** :-सांगली सातारा सोलापूर जिल्ह्याच्या सरहद्दीवर असलेल्या व सद्‌गुरु श्री श्री रविशंकरजी तथा गुरुजी यांच्या प्रेरणेने सुरू असलेल्या सद्‌गुरु श्री श्री साखर कारखान्याचे चेअरमन मा. एन. शेषागिरी राव सर, व्हाईस चेअरमन बाळासाहेब कर्णवर पाटील सर्व संचालक मंडळाच्या सहकार्यातून सतत हा कारखाना धार्मिक सामाजिक शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये अनेक प्रकारच्या सेवा केल्या जात असतात त्याच पद्धतीने आषाढी वारीच्या निमित्ताने सातारा पंढरपूर रोड वरून दिंड्या व पालखी सोहळ्यातील भाविक भक्तांना पिण्याच्या पाण्याची सेवा उपलब्ध व्हावी या उद्देशाने पाण्याचा टँकर दिला असून त्या टँकरचे पूजन सोलापूर



जिल्हा परिषद अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र पिलीवचे वैद्यकीय अधिकारी डॉ. विलास जाधव त्याचप्रमाणे आरोग्य विभागाचा संपूर्ण कर्तव्यदक्ष स्टाफ यांच्या हस्ते करण्यात आला. या सेवेबद्दल सद्‌गुरु साखर कारखान्याला असंख्य भाविक भक्त धन्यवाद देत आहेत. व याबाबत डॉ. विलास जाधव व त्यांचे सहकारी ग्रामस्थ यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

## पार्टीसाठी आलेल्या महिलेवर मद्याच्या नशेत लैंगिक अत्याचार

### अलिबागमधील अलास्का व्हिलामधील धक्कादायक घटना; आरोपीवर अलिबाग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

१ जुलै मुंबईतील एका कंपनीच्या पार्टीसाठी अलिबाग येथे आलेल्या महिला कर्मचाऱ्यावर तिच्याच सहकाऱ्याने मद्याच्या नशेत लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना अलिबाग तालुक्यातील मुशेत येथे समोर आली आहे. या प्रकरणी पीडित महिलेने अलिबाग पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, अभिषेक सावडेकर (वय २५, रा. कोपरखैरणे, वाशी, ठाणे) या सेल्स एक्झेक्युटिव्हविरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ मधील




कलम ६४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सविस्तर माहिती अशी की, ३० जून रोजी मुंबईतील कंपनीतील १४ अधिकारी-कर्मचारी अलिबागमधील मुशेत येथील अलास्का व्हिला येथे ऑफिस पार्टीसाठी आले होते. पार्टीदरम्यान मद्यपान सुरू होते. पीडित महिला पगारविषयक काम पूर्ण करून रात्री साडे आठच्या सुमारास पार्टीत सहभागी झाली. मद्यप्राशनानंतर पीडित महिला जलतरण तलावाजवळ झोपली असताना तिच्या सहकाऱ्यांनी तिला बेडरूममध्ये नेले. पहाटेच्या सुमारास, म्हणजेच १ जुलै रोजी तीन ते साडे तीन दरम्यान, पीडित महिलेच्या जाणीवेवर परिणाम होऊ लागल्यावर तिला आपल्यावर कोणीतरी जबरदस्ती करत असल्याची जाणीव झाली. जागे झाल्यावर तिने पाहिले असता अभिषेक सावडेकर हा रूममधून बाहेर जाताना दिसला. त्यानंतर झालेल्या चौकशीत पीडित महिलेच्या निदर्शनास आले की अभिषेकनेच तिच्यावर जबरदस्ती केली आहे. सकाळी चौकशी करताच आरोपीने माफी मागत घाबरून कबुली दिल्याचे पीडित महिलेने सांगितले. त्यानंतर ती महिला विरार येथे गेली व पुढे अलिबाग पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात गु.र.नं. ११६/२०२५ नुसार भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ६४ अंतर्गत गुन्हा दाखल झाला असून, या प्रकरणाचा तपास महिला सहाय्यक पोलिस निरीक्षक सरिता मुसळे या प्रभारी पोलिस निरीक्षक किशोर साळे यांच्या मार्गदर्शनाखाली करत आहेत.

## शिवसंग्राम चे धनंजय पाटील बाजड यांनी दिले बांधकाम विभागाला धरणावरील भिंतीवरचे झाडे तोडण्याबाबत निवेदन.

दैनिक युवक आधार
उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम
गजानन पवार पाटील.

रिसोड तालुक्यातील जोगेश्वरी कुकसा अंचळ या धरणाच्या भिंतीवर बाभळीची वाढलेली झाडे न तोडल्यामुळे भिंतीला धोका निर्माण झालेला आहे. 25 व 26 जून रोजी पावसाची अतिवृष्टी बऱ्याच शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झालेले आहे. भिंतीवर बाभळीचे व दुसरे झाडे वाढल्यामुळे रिसोड तालुक्यातील खालील गावे जोगेश्वरी कुकसा अंचळ तपोवन जामखेडा नेतंसा मांगुळ झनक. नावली पेनबोरी या गावातील धरणाच्या भिंतीला धोका निर्माण झालेला आहे.तरी आम्ही शिवसंग्राम च्या वतीने व गावकऱ्यांच्या वतीने दि.9.7.2025. रोजी. जोगेश्वरी या धरणावर जलसमाधी आंदोलन करणार आहोत. तरी आपण या निवेदनाची तात्काळ दखल घेऊन त्वरित निर्णय द्यावा. निवेदनाची प्रत ही. जिल्हाधिकारी वाशिम यांनाही दिली आहे. तसेच. पोलीस अधीक्षक वाशिम यांनाही दिली आहे. पोलीस स्टेशन शिरपूर ठाणेदार यांनाही दिलेली आहे... तरी सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी या प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन.. गावकऱ्यांना व शेतकऱ्यांना व शिवसंग्राम ला न्याय द्यावा.

> जोगेश्वरी. कुकसा. अंचळ. पेनबोरी. नावली. तपोवन. जामखेडा. नेंतन्सा. या गावांसाठी घेतला शिवसंग्रामने निवेदनाचा व आंदोलनाचा पुढाकार.
> **(धनंजय पाटील बाजड.)**

## केंद्रीय सहकारिता मंत्रालय स्थापना सप्ताह अंतर्गत सहकारी संस्थांची कार्यशाळा

### सहकार पुरस्कारासाठी १८ जुलै पर्यंत जास्तीत जास्त नामांकन दाखल करावेत -जिल्हा उपनिबंधक डॉ. सोपान शिंदे

**दैनिक युवक आधार**
**रत्नागिरी, (जिमाका)**

जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती बँक लि. आणि रत्नागिरी जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. आयोजित आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ निमित्ताने जिल्ह्यातील सहकारी संस्थांची कार्यशाळा रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या प्रधान कार्यालयात आज झाली. काश्मीर ते कन्याकुमारी देशभरात सहकार चळवळ बांधण्यासाठी केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी सहकारिता मंत्रालयाची स्थापना केली. सहकार पुरस्कारसाठी जिल्ह्यातून जास्तीत जास्त नामांकन १८ जुलैपर्यंत दाखल व्हावेत, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक डॉ. सोपान शिंदे यांनी केले. जिल्हा उपनिबंधक श्री. शिंदे यांनी वार्षिक सर्वसाधारण सभा यावर मार्गदर्शन केले. विकास संस्था, फेडरेशन ग्रुप यांच्या समुहावर सर्व निकष, विविध माहिती दिली जात असते. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून जास्तीत जास्त गावातून सहकार पुरस्कारसाठी नामांकन यावेत, अशी अपेक्षा आहे. १८ जुलै पर्यंत ही नामांकनं येण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. देशभरात सहकार चळवळ बांधण्यासाठी ६ जुलै २०२१ रोजी केंद्रीय सहकारिता विभाग स्थापन झाला. केंद्रीय सहकार मंत्री श्री. शहा यांनी ही चळवळ काश्मीर पासून कन्याकुमारीपर्यंत बांधण्यासाठी पुढाकार घेतला. गुजरात राज्य सहकारी बँकेने आणि तेथील मध्यवर्ती बँकेमार्फत त्यांनी केलेल्या कार्याबाबत माझ्या अभ्यास दौऱ्याचा दीडशे पानाचा अहवाल शासनाला सादर केला असल्याचेही ते म्हणाले. आदर्श लेखा परिक्षण या विषयावर जिल्हा विशेष लेखा परिक्षक विनोद अंडुस्कर यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, शासनाच्या सहकार विभागाकडून वेळोवेळी शासन निर्णय परिपत्रके दिली जात असतात. या सर्वांच्या माध्यमातून सर्वांनी कामकाज करावे. आदर्श संचालक मंडळ सभा विषयावर स्वामी स्वरुपानंद सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष अड दीपक पटवर्धन यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, उत्तम पध्दतीने आपापली संस्था मार्गस्थ व्हावीत. व्यवहार स्वच्छ रहावेत. ज्या उद्देशाने संस्था स्थापन केली, तो सफल व्हावा, यासाठी संचालक मंडळांची सभा ही महत्त्वाची असते. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सरव्यवस्थापक डॉ. सुधीर गिम्हवणेकर यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर या विषयावर मार्गदर्शन केले. ग्राहक एसआयपी, एसडब्लूपी अशा नव्या गोष्टींकडे वळत आहेत. कृत्रिम बुध्दीमत्तेच्या माध्यमातून संगणकामध्ये सुधारणा आली आहे. आधुनिक सेवा प्रदान करताना त्वरित निर्णय घेण्याची क्षमता कृत्रिम बुध्दीमत्तेमध्ये आहे. शासकीय लेखा परिक्षक महेश जाधव यांनी आदर्श लेखा परिक्षण, सहाय्यक निबंधक साहेबराव पाटील यांनी वार्षिक सर्वसाधारण सभा या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अजय चव्हाण आणि कोमसापचे गजानन पाटील उपस्थित होते. सहकार सोपान क्युआर कोड ग्रंथालय या पोस्टर्सचे वाटप जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत सातपुते यांच्या हस्ते उपस्थित संस्थांना करण्यात आले. विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी, प्रतिनिधी सहभागी झाले होते.

## स्टोअरचा शानदार शुभारंभ संपन्न

**पान १ वरुन**

सौ. सेजल पाटील यांच्याप्रमुख उपस्थितीत नील हेर्मिटेज, सुरूची हॉटेल जवळ, पनवेल येथे संपन्न झाले. यावेळी बोलताना मा. खा. रामशेठ ठाकूर म्हणाले की, चंदुकाका सराफ प्रा. लि.यांच्या पनवेल सुवर्णदालनामुळे चंदुकाका सराफ प्रा. लि. व पनवेलवासीयांचा ऋणानुबंध अधिक घट्ट होणार आहे. सर्व पनवेलकर चंदुकाका सराफ प्रा. लि. यांना उत्स्फूर्त प्रतिसाद देतील अशी मला खात्री आहे. यावेळी बोलताना चंदुकाका सराफ प्रा. लि. चे चेअरमन श्री. किशोरकुमार शहा म्हणाले की, १९८ वर्षांची शुध्द सोन्याची परंपरा असलेल्या चंदुकाका सराफ प्रा. लि. यांची पनवेल शाखा सुरु करताना आम्हांला विशेष आनंद होत आहे. संपूर्ण महाराष्ट्रात ग्राहकांशी विश्वासाचे नाते पिढ्यानपिढ्या पासून जतन करत चंदुकाका सराफ प्रा. लि. यांनी आज पर्यंत सुवर्ण वाटचाल केली आहे. पनवेलकरांचे आणि आमचे नाते अधिक दृढ होईल अशी मला खात्री आहे. यावेळी पनवेलवासीयांनी खरेदीसाठी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला होता. शुभारंभानिमित्त ग्राहकांसाठी खास ऑफर्स देण्यात आल्या आहेत. चंदुकाका सराफ प्रा. लि. यांच्या पनवेल स्टोअरमध्ये दि. ४ ते ९ जुलै २०२५ दरम्यान दागिने खरेदीवर महिंद्रा थार आणि ज्युपिटर बाइक्स जिकण्याची सुवर्णसंधी आहे. रु. ३०,००० किंवा त्याहून अधिक खरेदी तसेच रु. ३,००० किंवा त्याहून अधिक गुंतवणूक करणाऱ्या ग्राहकांसाठी ही खास संधी असणार आहे. तसेच १०%* सूट सोन्याच्या दागिन्यांच्या घडणावळीवर आणि १००%* पर्यंत सूट हिऱ्यांच्या दागिन्यांच्या घडणावळीवर देण्यात येणार आहे. सर्व ग्राहकांनी चंदुकाका सराफ प्रा. लि.यांच्या ह्या नव्या स्टोअरला भेट द्यावी आणि दागिने खरेदीवर ज्युपिटर बाइक व महिंद्रा थार जिंकण्याची संधीही मिळवावी असे आवाहन चंदुकाका सराफ प्रा. लि.चे चेअरमन श्री. किशोरकुमार शहा व मॅनेजिंग डायरेक्टर कु. सम्यक किशोरकुमार शहा यांच्यातर्फे करण्यात आले आहे. नियम व अटी लागू. अधिक माहितीसाठी टोल फ्री क्रमांक: 1800 267 8555

## सापळी गावात जनावरांसाठी फऱ्या (BQ) या रोगाचे लसीकरण संपन्न.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**

वाशिम तालुक्यात सापळी येथे जनावरांना गुराढोरांना फऱ्या (BQ) या रोगाचे लसीकरण दि.3.7.2025.रोजी .डॉ.दिलीप इंगळे. तसेच डॉ.निरंजन चव्हाण. यांनी फऱ्या (BQ) लसीकरण केले संपन्न. लसीकरणाच्या वेळेस गावातील शेतकऱ्यांनी ज्यांच्याजवळ जनावरे आहेत त्यांनी उपस्थिती दर्शवून केले डॉक्टरांना सहकार्य.. गावातील उपस्थित शेतकरी भागवत नत्थुजी ढगे. रामदास दत्तराव चव्हाण. केशव शेषराव ढगे. विठ्ठल रामराव ढगे. करण गजानन ढगे. साहिल शंकर चव्हाण. गजानन उत्तम ढगे. एकनाथ चव्हाण. गजानन पुंजाजी ढगे. मयूर हरिदास चव्हाण. पुंजाजी गणपत ढगे. शिवाजी रुस्तुमराव ढगे. यांनी उपस्थिती दर्शवून सापळी गावातील जनावरांचं लसीकरण संपन्न.



## विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देत विद्यालयात उत्कृष्ठ खेळाडू घडवणार- अजित गावडे

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संतोष लांडे पुणे**

**टाकळी हाजी (शिरूर) :** बेट भागातील टाकळी हाजी येथील मा. बापुसाहेब गावडे माध्य. उच्च माध्यमिक विद्यालय या ठिकाणी राष्ट्रीय पातळीवर किकबॉक्सिंग स्पर्धेस निवड झालेल्या खेळाडू चा सत्कार सोहळा नुकताच संपन्न झाला. ऑल महाराष्ट्र किंक बॉक्सिंग स्पर्धेत राज्यपातळीवर कुमारी मिजबा शौकत मुजावर हीने फुल कॉन्टॅक्ट प्रकारात सुवर्ण पदक, कुमारी तनिशा शौकत मुजावर के वन प्रकारान सुवर्ण पदक प्राप्त करत चेन्नई येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत निवड




झाली. या वेळी विद्यालयाचे प्रा.एस.एस.वाघमारे सरांनी सर्व विद्यार्थ्यांना खेळाबाबत मार्गदर्शन करत खेळांच्या माध्यामातून ग्रेस गुण कसे मिळतात ही माहिती सांगितली. ग्रामीण भागातील विद्यालयाचे गरिब कुंटूबांतील दोन खेळाडू राज्य पातळीवर चमकत त्यांची राष्ट्रीय पातळीवर निवड होते ही उल्लेखनिय असुन विद्यालयाचे नाव राज्य नव्हे तर राष्ट्रीय पातळीवर चमकावे म्हणून विद्यालयातील खेळाडूंच्या कला गुणाना वाव मिळावा म्हणून त्यांच्या सुप्त गुणांना शोधून शिक्षकांच्या मदतीने विविध खेळातील खेळाडूना प्राधान्य देवू तसेच विद्यालयाकडून शक्य तेवढी मदत करू वेळेप्रसंगी विद्यालयाला सहकार्य करणारे यांना भेटून शक्य तेवढी मदत घेण्याचा प्रयत्न करणार असुन दोन्ही खेळाडूना राष्ट्रीय स्पर्धेस पाठवणार आसल्याचे विद्यालयाचे व्यावस्थापक अजित गावडे सरांनी सांगितले. सत्कार सोहळ्यावेळी शालेय शिक्षक एस.सी.गावडे,एम. पी.गावडे,आर. एम.चाटे मॅडम,डी.एम.निचित, धुमाळ सर,पठारे सर,चौधरी सर, भोर मॅडम,के.एस.वाघमारे सर हे उपस्थित होते.माजी प्राचार्य खोमणे यांनी विद्यार्थीनीला प्रवासासाठी एक हात मदतीचा म्हणून सहकार्य केले. राष्ट्रीय पातळीवर निवड झालेल्या खेळाडूंना संस्थेचे संस्थापक माजी आमदार पोपटराव गावडे,संचालक राजेंद्र गावडे,सुनितताई गावडे, शिरूर पोलीस स्टेशनचे पी.आय संदेश केंजळे,मा. प्राचार्य आर.बी. गावडे,विद्यमान सरपंच अरुणाताई दामूशेठ घोडे,सर्व सदस्य,शाळा व्यावस्थापन समिती अध्यक्ष धोडीभाऊ जाधव,पोलीस मित्र धोंडीभाऊ गावडे,हॉटेल विश्वपॅलेस उद्योग समुहाचे संस्थापकपै.तुकाराम उचाळे, शांताई उदयोग समुहाचे दिलीपशेठ सोदक,युवा उद्योजक पै. प्रशांत चोरे आदरणीय पत्रकार बांधव संजय बारहाते, साहेबराव लोखडे,प्रविणजी गायकवाड ,विजय लोखंडे, शुभम वाघचौरे ,अरुणकुमार मोटे,सुजित मैड,योगेश भाकरे, द युवा ग्रामीण पत्रकार संघाचे पुणे अध्यक्ष शकील मणियार,दै. लोकशक्ती न्युजचे कार्यकारी संपादक इम्रान शेख सह संपूर्ण टीम,म्हसे,चांडोह,गुनाट,वडनेर शाखेचे शिक्षक,कर्मचारी सह ग्रामस्थ,पालक,विद्यार्थी यांनी शुभेच्छा दिल्या.

## एमपीएससी उत्तीर्ण उमेदवारांच्या नियुक्त्यांसाठी आमदार प्रशांत ठाकूर आणि महेश बालदी यांनी वेधले शासनाचे लक्ष

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

राज्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परिक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या पात्र उमेदवारांना नियुक्ती मिळण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल करून या विषयावर शासनाचे लक्ष वेधले. राज्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) अराजपत्रित गट 'ब' व गट "क" लिपिक टंकलेखक भरती प्रक्रियेद्वारे ७००६ पदे भरण्यात येणार होती. मात्र, पात्र उमेदवारांची संख्या भरपूर असूनही दिनांक १६ एप्रिल २०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या यादीत फक्त ६६१३ उमेदवारांचीच निवड करण्यात आली असून शासनाच्या विविध विभागांतील ३९३ पदे रिक्त असल्यामुळे लिपिक वर्गाच्या कमतरतेमुळे कामकाजावर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे. निवड रद्द केलेल्या उमेदवारांची यादी दिनांक २४ एप्रिल २०२५ रोजी प्रसिद्ध करूनही, त्यानंतर रिक्त जागांसाठी अद्याप पर्यायी निवड यादी प्रसिद्ध करण्यात आलेली नसल्याने अनेक पात्र उमेदवारांची संधी वाया गेली असून, संभ्रमाची स्थिती निर्माण झाली आहे. तसेच, राज्य लोकसेवा आयोगामार्फत जानेवारी २०२३ मध्ये कर सहायक या पदावरील ४६८ उमेदवारांना व राज्य उत्पादन शुल्काची ५ पदे असून त्यांनाही अद्याप नियुक्ती मिळाली नसुन तांत्रिक सहाय्यक-१ पद असून याचा निकालच प्रलंबित असल्याने अशा ८,१७० पदांची नियुक्ती प्रलंबित आहे, त्यामुळे या प्रकरणी शासनाने केलेल्या चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांनी दाखल केला होता. या प्रश्नावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले कि, दिनांक १६ एप्रिल २०२५ रोजी आयोगाने लिपिक-टंकलेखक संवर्गाची अंतिम निवड यादी प्रसिध्द केली नसून नियुक्ती प्राधिकारीनिहाय स्वतंत्र तात्पुरती निवड यादी प्रसिध्द केली आहे. त्यानुसार ६६०० उमेदवार शिफारसपात्र ठरले आहेत. आयोगाने लिपिक-टंकलेखक संवर्गाची सर्वसाधारण गुणवत्ता यादी दि.११.०२.२०२५ रोजी प्रसिध्द करुन उमेदवारांकडून नियुक्ती प्राधिकारी निहाय पसंतीक्रम मागविला. उमेदवारांच्या पसंतीक्रमानुसार २७८ नियुक्ती प्राधिकारी निहाय स्वतंत्र तात्पुरत्या निवड याद्या दि.१६.०४.२०२५ रोजी प्रसिध्द केल्या. त्यानंतर आयोगाने उमेदवारांकडून OPTING OUT चा विकल्प मागविण्यात आला असता ६७१ उमेदवारांनी OPTING OUT चा विकल्प निवडला. त्यानुसार अंतिम निकाल जाहिर करण्याची कार्यवाही आयोगाच्या स्तरावर सुरु आहे. कर सहायक या संवर्गासाठी विज्ञापित केलेल्या ४६८ पदांपैकी आयोगाने शिफारसपात्र ठरलेल्या ४६५ उमेदवारांची मार्च, २०२५ मध्ये वित्त विभागास शिफारस केली. त्यापैकी १८५ उमेदवारांना मे, २०२५ मध्ये नियुक्ती आदेश देण्यात आले असून उर्वरित उमेदवारांचा प्रमाणपत्र पडताळणीचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्वरित नियुक्ती आदेश देण्यात येतील. दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क या संवर्गासाठी विज्ञापित केलेल्या ६ पदांसाठी आयोगाने ६ उमेदवारांची एप्रिल, २०२४ मध्ये गृह विभागास शिफारस केली. त्यापैकी १ उमेदवार कागदपत्र पडताळणीस गैरहजर होता व २ उमेदवार पडताळणीअंती अपात्र ठरले. उर्वरित ३ उमेदवार पात्र ठरल्याने त्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले. त्यानंतर गृह विभागाने मागणी केल्यानुसार आयोगाने प्रतिक्षायादीतून ३ उमेदवारांची शिफारस मे, २०२५ मध्ये केली. सदर ३ उमेदवारांची कागदपत्र/प्रमाणपत्र व शारिरीक पडताळणी करण्याची कार्यवाही सुरु असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्वरित नियुक्ती आदेश देण्यात येतील तांत्रिक सहाय्यक या संवर्गासाठी शिफारस केलेल्या एका पदावर दि.११.०९.२०२४ च्या आदेशान्वये नियुक्ती देण्यात आली आहे.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## 'ईट प्ले रीड ऑर्गनायझेशनच्या माध्यमातून परिसरामध्ये ताक वाटप

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

ईट प्ले रीड संस्थेच्या संस्थापक अपर्णा शहा यांच्या मार्गदर्शनाखाली ईट प्ले रीडच्या रजदूतांकडून पनवेल, नवी मुंबई विभागामध्ये ताक वाटप करण्यात आले.

ईट प्ले रीडकडून नेहमीच सामाजिक, शैक्षणिक उपक्रम पनवेल -नवी मुंबई मध्ये राबवले जातात. या संस्थेचा हा उल्लेखनीय प्रयत्न मोठ्या प्रमाणावर समुदायाकडून मान्यता आणि समर्थनास पात्र आहे. संस्थेच्या वतीने पनवेल- नवी मुंबई मध्ये ताक वाटप करण्यात आले. जेणे करुण नागरिकांना त्यातून एनर्जी मिळावी शरीराला आतून थंडावा मिळावा. यावेळी अनेक नागरिक उपस्थित होते.









## अपघाती मृत्यू झालेल्या काकासाहेब बिडवेच्या वारसांना बुलढाणा अर्बन तर्फे मदतीचा हात

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** सिल्लोड भराडी रोडवर पाई जाणाऱ्या स्व . काकासाहेब बाबुराव बिडवे यांना दुचाकीने धडक दिल्याने त्यांचा अपघाती मृत्यु झाला होता.त्यांनी बुलढाणा अर्बन मल्टीस्टेट पत संस्थेतर्फे सोने तारण कर्ज घेतले होते. अखेर बुलढाणा अर्बन संस्थेतर्फे सदर सर्व सोनेतारण विमा रक्कम परत करून एक मदतीचा हात बिडवे कुटुंबीयांना दिला आहे . सहकाराला सामाजिक कार्याची जोड देऊन "सहकाराचे तत्त्व जनहिताला महत्व" हे ब्रीद वाक्य सत्यात उतरविणारी सहकारा सोबत सामाजिक बांधिलकीची जपणूक करणारी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात आणि सोशल बँकिंग राबून सर्व



सामान्याच्या हितासाठी सदैव तत्पर असणाया बुलडाणा अर्बन संस्थेच्या शाखा भराडी च्या वतीने संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आ.भाईजी चांडक, संस्थेचे नवनिर्वाचीत अध्यक्ष मा.श्री. सुकेशजी झंवर साहेब आणि सहकार विद्या मंदिरच्या अध्यक्षा सौ. कोमलताई झंवर यांच्या प्रेरणेने, बुलडाणा अर्बन शाखा भराडी येथील स्थानिक सल्लागार यांचे उपस्थितीत मयत कर्जदाराच्या वारसदारांना विमा राशीचा धनादेश देण्यात आला . बुलडाणा अर्बन शाखा भराडी येथील सभासद ठेवीदार स्व. काकासाहेब बाबुराव बिडवे यांचा दिनाक २४.०३.२०२५ रोजी मोटार सायकल अपघातात मृत्यू झाला असता सदर दुर्देवी घटनेची माहिती मिळताच शाखा व्यवस्थापक संदीप कुलकर्णी यांनी, सिल्लोड विभागीय व्यवस्थापक श्री संजय आनंदा दळवी यांचे मार्गदर्शनात बिडवे परिवाराची भेट घेऊन सांत्वन केले. संस्थेच्या वतीने देण्यात येणाऱ्या विमा योजनेची माहिती बिडवे कुटुबियांना दिली.स्व. काकासाहेब बिडवे यांनी संस्थे मंध्ये 80 हजार रु. मात्र सोने तारण कर्ज घेतले होते. व सदर कर्जाला त्यांची पत्नी सुरेखा काकासाहेब बिडवे ह्या वारसदार होत्या.या प्रकरणाची माहिती मुख्यालयी देऊन विम्याच्या प्रस्ताव मंजूर होऊन आल्यानंतर बुलडाणा अर्बनच्या कार्यालयात एका छोटे खाणी कार्यक्रमात संस्थेच्या वतीने सभासदाच्या कर्जाची राशी व तेवढीच विम्याची राशी रुपये ८०६९८ रुपयाचा विम्याचा धनादेश बुलडाणा अर्बनचे स्थानिक सल्लागार श्री महावीर कर्नावट, श्री बाजीराव बखळे, डॉ शेलेश काळे, श्री रमेशचंद साखला यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी सुरेखा काकासाहेब बिडवे ( पत्नी ), ह भ प बाबुराव महाराज बिडवे (वडील ),उमेश काकासाहेब बिडवे (मुलगा),भाऊसाहेब बाबुराव बिडवे( भाऊ ) यांच्यासह बुलढाणा अर्बनचे कर्मचारी यांची उपस्थिती लाभली होती. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाखा व्यवस्थापक भराडी व सर्व कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले .यावेळी मनोगत व्यक्त करताना शाखा भराडी शाखेचे शाखा व्यवस्थापक विश्वास दळवी यांनी कर्जदार सभासदांच्या हयातीतील व मृत्यूनंतर देखील बुलढाणा अर्बन सभासद व ग्राहकांच्या व त्यांच्या परिवारांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहते असे स्पष्ट करून, संस्थेच्या विमा योजना व सामाजिक उपक्रमाची सविस्तर माहिती दिली.

## आषाढी वारीचा भक्तीभाव समोर ठेवत डॉ.माने समर्थ हॉस्पिटल कडून परशुराम जोमा म्हात्रे विद्यालयास संतांचे चरित्र ग्रंथ भेट

**दैनिक युवक आधार**
**कळंबोली प्रतिनिधी**

सध्या महाराष्ट्रात आषाढी एकादशी व वारीचे भक्तीमय वातावरण समोर ठेऊन महाराष्ट्रील संत हेच या वारीचे व विठ्ठल भक्तीचे प्रणेते आहेत त्या अन्वये भक्तीमय वातावरणाचा लाभ घेत डॉ.प्रकाश माने व डॉ.सौ.सविता माने ( डॉ.माने समर्थ हॉस्पिटल ,कळंबोली)यांनी आज परशुराम जोमा म्हात्रे विद्यालय ( नावडे हायस्कूल ) येथे महाराष्ट्रातील वेगवेळ्या दहा ते बारा संताची चरित्र पुस्तके विद्यालयाच्या ग्रंथालयास गुरुवार दि.३,जुलै रोजी भेट दिली. संताची चरित्रे ही मानवी मनावर चांगले संस्कार करणारे एक श्रेष्ठ साधन आहे.संतांच्या चरित्र ग्रंथामध्ये चारित्र्यवान पिढी निर्माण करण्याची क्षमता आहे,पुष्कळदा आपणास संतांची फक्त नावेच माहीत असतात किवा फार तर त्यांनी केलेला एखादा चमत्कार पण ज्या उच्चतम वंदनीय अवस्थेपर्यंत ते पोहचले त्यासाठी त्यांनी केलेले त्याग,कष्ट,त्यांचे कारुण्य,परमात्मनिष्टा, सर्वांच्या हिताविषयी असणारी तळमळ त्यांनी केलेला बोध याची ओळख फार थोड्या लोकांना असते. ती ओळख सर्वांना व्हावी म्हणून डॉ.श्री.व सौ.माने गेली चार वर्षे संताची चरित्र ग्रंथ वेगवेगळ्या शाळांना भेट देत आहेत,लहान मुलांमध्ये तरुणांमध्ये आध्यात्म व भक्तीचे बीज रुजवण्यासाठी त्यांनी हा उपक्रम राबवला याबद्दल डॉ.माने दांपत्याचे समाजाकडून कौतुक होत आहे

## महिलांना दोन हजार रुपये, साडी आणि रेशनचे सामान वाटत आहे असे सांगून केली फसवणूक

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

एका मोठ्या माणसाच्या मुलाचा वाढदिवस आहे तो गरीब महिलांना दोन हजार रुपये, साडी , रेशनचे सामान आणि चपला वाटत आहे असे बोलून 80 वर्षीय महिलेकडील 15 ग्राम वजनाची सोन्याची बोरमाळ चोरून नेल्याप्रकरणी दोन अनोळखी ईसमाविरोधात कामोठे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. 80 वर्षीय महिला या वागळे इस्टेट, ठाणे येथे राहत असून त्या जून महिन्यात कामोठे, सेक्टर 34 येथील मुलाकडे आल्या होत्या. एक जुलै रोजी त्या पुरातन गणेश मंदिरात गेल्या. दर्शन घेऊन सेक्टर 35, कामोठे येथील मुलीच्या घरी पायी चालत निघाल्या. यावेळी रस्त्यात एक इसम भेटला आणि एका मोठ्या माणसाच्या मुलाचा वाढदिवस आहे तो गरीब महिलांना दोन हजार रुपये, साडी, रेशनचे सामान आणि चपला वाटत असल्याचे सांगितले. आणि त्याने गल्लीमधून सेक्टर 11 मध्ये नेले. त्या ठिकाणी कठड्यावर बसवले आणि दुसरा माणूस पांढरी पिशवी घेऊन आला. त्यानंतर त्यांच्या गळ्यातील सोन्याची बोरमाळ काढून पैशांच्या पाकिटात ठेवायला सांगितली. त्यानंतर चप्पल, फोन पिशवीत ठेवण्यास सांगितले व पिशवीला गाठ मारून पिशवी त्यांच्या जवळील पांढऱ्या पिशवीत टाकून पांढरी पिशवी त्यांच्या हातात दिली. काही वेळाने गहू, तांदूळ नेण्यासाठी रिक्षा घेऊन येतो असे सांगितले आणि ते दोघेजण निघून गेले. आणि परत आले नाहीत. त्यांनी पिशवी उघडून पाहिली असता त्यात बिस्किटांचे पुडे सापडले.

## भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या पुरोगामी युवक संघटनेच्या रायगड जिल्हा अध्यक्षपदी देवेंद्र पाटील यांची पुन्हा निवड

**दैनिक युवक आधार**
**पनवेलः (आनंद पवार)**

पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक व देवळोली ग्रामपंचायतीचे विद्यमान उपसरपंच श्री.देवेंद्र अनंत पाटील यांची भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या पुरोगामी युवक संघटनेच्या रायगड जिल्हाध्यक्ष पदी पुन्हा एकदा फेरनिवड झाल्याबद्दल देवेंद्र पाटील यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.
अलिबाग येथील शेतकरी भवनात शुक्रवारी संपन्न झालेल्या चिटणीस मंडळाच्या बैठकीत त्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. समाजाच्या प्रत्येक घटकाला न्याय मिळवून देण्यासाठी त्यांचा नेहमीच पुढाकार असतो.शेकापक्षाचा एकनिष्ठ व निष्ठावंत युवा तरुण म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.देवेंद्र पाटील यांचे कार्याची दखल घेत पुन्हा पक्षश्रेष्ठींनी त्यांच्यावर शेतकरी कामगार पक्षाच्या पुरोगामी युवक संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी पुन्हा फेर निवड करत जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी



सोपवली आहे. देवेंद्र पाटील यांची पुन्हा निवड झाल्याबद्दल शेकापचे महाराष्ट्र राज्य सरचिटणीस तथा विधान परिषदेचे माजी आमदार भाई जयंत पाटील,माजी आमदार बाळाराम पाटील साहेब,शेकापचे जिल्हा चिटणीस व आरडीसीसी बँकेचे व्हाईस चेअरमन सुरेशशेठ खैरे,शेकापचे राज्य चिटणीस मंडळाचे खजिनदार अतुलशेठ म्हात्रे,पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायणशेठ घरत,महाराष्ट्र राज्य प्रवक्ते चित्रलेखा नृपाल पाटील,महाराष्ट्र राज्य महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ.मानसीताई म्हात्रे,महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष शिवानीताई संतोष जंगम,शेकापचे जिल्हा सहचिटणीस अँड गौतम पाटील,जिल्हा सहचिटणीस तेजस्वी घरत,शेकापचे कामगार आघाडीचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष प्रदीप नाईक,शेकापचे ज्येष्ठ नेते शंकरराव म्हसकर तसेच आदी मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. देवेंद्र पाटील यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## स्मारक आणि पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

माजी आमदार दत्तूशेठ पाटील यांच्या स्मारक आणि पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण सोहळा मंगळवार आठ जुलै रोजी सकाळी दहा वाजता रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या हस्ते परशुराम जोमा म्हात्रे विद्यालय, आत्माराम धोंडू म्हात्रे जुनियर कॉलेज व आयटीआय नावडे (पनवेल) येथे होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार जयंत पाटील (सरचिटणीस शेकाप), चंद्रकांत दळवी, (चेअरमन, रयत शिक्षण संस्था) बाबासाहेब देशमुख (विधानसभा सदस्य, सांगोला), एड.भगीरथ शिंदे, किशोर दराडे (विधानपरिषद सदस्य), डॉ. अनिल पाटील, श्रीकांत देशपांडे (माजी विधान परिषद सदस्य), विकास देशमुख, दत्तात्रय सावंत (माजी विधान परिषद सदस्य), बाळाराम पाटील (चेअरमन रयत शिक्षण संस्था रायगड) यांच्यासह चेअरमन, मुख्याध्यापक, स्थानीक सल्लागार समिती, शिक्षक, माजी विद्यार्थी संघटना, शेतकरी कामगार पक्षाचे पनवेल, उरणचे कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## गव्हाण विद्यालयात सायबर सुरक्षा व रस्ते वाहतूक सुरक्षा समुपदेशन, सायबर गुन्हे व डिजिटल फॉरेन्सिकचे विशेषज्ञ विदाश्री भांगे यांचे समुपदेशन

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या येथील छत्रपती शिवाजी विद्यालय गव्हाण व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेज मध्ये 3 जुलै रोजी सायबर सुरक्षा व विद्यार्थ्यांनी घ्यावयाची काळजी या विषयावर सायबर गुन्हे व डिजिटल फॉरेन्सिक विशेषज्ञ विदाश्री भांगे यांचे अभ्यासपूर्ण समुपदेशन संपन्न झाले. न्हावा शेवा पोलीस स्टेशन वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जी.एम.मुजावर यांच्या मार्गदर्शनाखाली व अनिवासी रयत गुरुकुल अंतर्गत संपन्न झालेल्या या समुपदेशन शिबीरास वाहतूक पोलीस किरण म्हात्रे व राजू भांगरे, मयूर पाटील, प्राचार्या व संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रवींद्र भोईर, संदीप भोईर, संजय उगले राजेंद्र चौधरी, माणिक घरत, करुणा तांडेल, अर्चना पाटील, जयराज सोनटक्के, ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे, क्रीडा शिक्षक सुरेश पारखे आदी उपस्थित होते. विदाश्री भांगे यांनी फेसबुक ,स्नॅपचॅट, व्हाट्सअप, इंस्टाग्राम याद्वारे होणाऱ्या गुन्ह्यांबद्दल माहिती



दिली. आज मोठ्या प्रमाणात तीन पत्ती, रम्मी ऑनलाइन खेळली जाते यामुळे अनेक विद्यार्थी या जाळ्यामध्ये कसे अडकले आहेत याबद्दल माहिती दिली. एखादा गुन्हा घडला तर त्यानंतर कोणती काळजी घ्यावी, आपल्याकडून कोणताही गुन्हा घडला नसेल तर सायबर हेल्पलाइनची मदत घेणे कसे आवश्यक आहे या विषयी विस्ताराने माहिती सांगून समुपदेशन केले. विद्यार्थ्यांनी मोबाईल वापरताना विशेष काळजी घेण्याची आवश्यकता प्रतिपादन करताना एखादा अनोळखी अप डाऊनलोड करणे, एखादी अनोळखी वेबसाईट लिंक ओपन करणे टाळावे तसेच सोशल मीडियावरील अवैध अमिषाला बळी पडू नये असाही असा सल्ला दिला. तसेच लिडियन डिजिटल टेक्नॉलॉजी च्या अध्यक्षा विजया सिंग यांच्या सहयोगाने सायबर गुन्हे रोखण्यासाठी व नागरिकांना त्वरित मदत मिळण्यासाठी आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (AI ) चा वापर करून एक हेल्प चॅटबॉट डेव्हलप केला असून प्रशासनाशी चर्चा करून तो लवकरच नागरिकांसाठी वापरात आणला जाईल असेही त्यांनी सांगितले. यावेळी वाहतूक पोलीस मयुर पाटील यांनी दुचाकी वाहनस्वारास हेल्मेटची अनिवार्यता तसेच रस्ता ओलांडताना सिग्नलचे ज्ञान व विविध वाहतूक चिन्हांची माहिती दिली. राजू भांगरे यांनी रस्त्यावर होणाऱ्या अपघाताबद्दल माहिती सांगितली व अपघात टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी या विषयी मार्गदर्शन केले.

## संत गाडगेबाबा परीट समाज संस्था जिल्हाध्यक्षपदी पत्रकार सुभाष कदम

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार**
**चिपळूण प्रतिनिधी**

संत गाडगेबाबा परिट समाज संस्था जिल्हा रत्नागिरीची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच पेठमाप परिट आळी विठ्ठल मंदिरात संस्थेचे अध्यक्ष दीपक कदम यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीत झाली. यावेळी संस्थेच्या जिल्हाध्यक्षपदी पत्रकार सुभाष कदम व कार्याध्यक्षपदी माजी नगरसेवक मनोज शिंदे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या सभेत निवड समिती गठीत करून सर्वानुमते 2025 ते 2028 या कालावधीसाठी नवनिर्वाचित कार्यकारिणी निवडण्यात आली. यामध्ये अध्यक्ष - सुभाष कदम, कार्याध्यक्ष - मनोज शिंदे, उपाध्यक्ष- वसंत पिंपळकर, उपाध्यक्ष- सुयोग घाग, सचिव- नवनीत भोसले, सहसचिव-



दिनेश कदम, कोषाध्यक्ष- रविंद्र ऊर्फ राजू भोसले, संघटक दुर्गेश्वर रोकडे, संघटक- नथुराम जांभुळकर तर सदस्य- सुरेश का. कदम, रमेश रा. महाडिक, रमाकांत पाटेकर, रवींद्र दुर्गावले, प्रकाश केळसकर, नरेंद्र दुर्गावले, रितेश महाडिक, शिवराज शिंदे, महिला सदस्या आरती शिंदे, वैशाली कदम यांची निवड करण्यात आली. सल्लागार दत्ताराम महाडिक, हसमुख पांगारकर, संतोष कदम, दीपक कदम, श्रीकृष्ण शिंदे, अशोक जांभुळकर, माजी नगराध्यक्षा सावित्री होमकळस हे काम पाहणार आहेत. लॉंड्री संघटना जिल्हाध्यक्ष महेश भोसले, महिला संघटना अध्यक्ष सौ. अंजली पिंपळकर, कार्याध्यक्ष सौ. वैशाली शिंदे, युवक जिल्हाध्यक्ष नितीन उर्फ पिंट्या चाळके, युवक कार्याध्यक्ष संदेश कदम यांची निवड जाहीर करण्यात आली. चिपळूण - गुहागर तालुकाध्यक्ष अजित पावसकर, दापोली - मंडणगड तालुकाध्यक्ष प्रथमेश दुर्गावले, लांजा - राजापूर तालुकाध्यक्ष विजयराव कदम, संगमेश्वर तालुकाध्यक्ष राजेंद्र कदम, खेड तालुकाध्यक्ष अशोक जांभुळकर हे पदसिद्ध सदस्य आहेत. लवकरच सर्व तालुका तसेच महिला, लॉंड्री व युवक कार्यकारणी निवडल्या जातील. निवड समिती सदस्य दत्ताराम महाडिक, हसमुख पंगारकर, संतोष कदम, दीपक कदम, अशोक जांभुळकर, श्रीकृष्ण शिंदे यांनी नवनिर्वाचित कार्यकारिणीचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

**प्रामाणिक कार्याचे फळ**

जिल्हा कार्यकारिणी सदस्य, दोन वेळा उपाध्यक्ष,सलग तीनवेळा कार्याध्यक्ष तसेच सलग 11 वर्षे राज्य उपाध्यक्षपद भूषविताना समाजाचे काम प्रामाणिकपणे करण्याचा प्रयत्न केला. याची दखल घेत समाजाने "राष्ट्रीय समाजभूषण पुरस्कार" देऊन गौरव केला व आता जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याने आपल्या प्रामाणिक कार्याचे फळ मिळाले असल्याने सर्वांना बरोबर घेऊन आपण जोमाने काम करू अशी प्रतिक्रिया अध्यक्ष सुभाष कदम यांनी व्यक्त केली.

## महात्मा फुले महाविद्यालयाच्या समोरील उड्डाण पुलाखालून वाहतूक धोकादायक

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर )**

महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या समोरील उड्डाण पुलाखालून वाहतूक धोकादायक झाली आहे. चिंचपाडा येथील जनहित सामाजिक संस्थेने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे व्यवस्थापक यांना अपघात टाळण्यासाठी उपाय करण्यासाठी निवेदन दिले आहे. महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालया समोरून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या सेवा रस्त्याच्या उड्डाण पुलाखालून दररोज मोठ्या संख्येने जड व



अवजड वाहने वाहतूक करतात.करंजाडे नोड, वडघर नोड आणि चिंचपाडा परिसरातील नागरिक याच मार्गाने प्रवास करतात. महामार्गाच्या सेवा रस्त्याच्या उड्डाणपुलाखाली दरवर्षी पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी जमा होते. या पाण्यामुळे वाहन चालकांना व पादचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. सेवा मार्गाच्या दोन्ही बाजूने जड अवजड वाहनांची भरधाव वेगाने वाहतूक सुरू असते. या परिसरातील रस्त्यावर गतिरोधक नाहीत. भरधाव वेगाने वाहने चालवणाऱ्या वाहन चालकांमुळे अपघात होत आहेत.संभाव्य अपघात टाळण्यासाठी उपाय करण्याच्या मागणीसाठी जनहित सामाजिक संस्थेचे प्रतिनिधी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व्यवस्थापनाला सचिन केणी यांच्या वतीने पत्र देण्यात आले.

# दिघोडे गावची सुवर्ण कन्या अवनी कोळी ची उत्तुंग भरारी : नेमबाजी स्पर्धेत भारतीय संघातून निवड.




**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**

नेमबाजी हा एक क्रीडा प्रकार आहे . यामध्ये नेमबाजी साठी बंदूक, पिस्तूल एअरगन यासारख्या शस्त्रांचा वापर केला जातो. त्यात अचूकता, वेग आणि नेमबाजी मधील कौशल्य तपासले जातात. रायफल ,एअर पिस्तूल, रायफल ५० मीटर तसेच शॉट गन या प्रकारात ट्रॅप, डबल ट्रॅप, आणि स्कीट हे नेमबाजी चे प्रकार आहेत. अशा या नेमबाजी स्पर्धेत विविध अंतरावरील आणि विविध प्रकारच्या लक्ष्यांवर नेम धरून गोळी मारली जाते. उरण तालुक्यातील दिघोडे गावची सुवर्ण कन्या अवनी अलंकार कोळी सामान्य घरातील, पण असामान्य कामगिरी खेडेगावातील जन्म त्यामुळे मुलगी म्हणजे शिकवायची अन् तीचे लग्न करायचे हा समज,पण तीच्या हातात भांडी आणि कपडे न देता तीच्या आई वडीलांनी तीच्या हाती बंदूक दिली बंदुकीची मक्तेदारी पुरुषांची असा ग्रामीण भागातील लोकांचा भ्रम जे रोपटे आईच्या परसदारी रुजते आणि सासरच्या अंगणात वाढते, मोठे होते हा विचार मागे सारून तीला बंदुकीचे शिक्षण देणं हे समाज मनाला पटले नाही.पण अवनी चे वडील अलंकार कोळी माजी उपसरपंच, विद्यमान सदस्य तसेच तेही राष्ट्रीय नेमबाज व उत्तम शुटिंग कोच असल्याने त्यांनी आपल्या कन्येला या क्षेत्रात प्रोत्साहन दिले आहे. त्यांनी तीच्या या क्षेत्रातील हुषारीचा, जिद्दीचा उपयोग करून आज त्यांचे स्वप्न ती पुर्ण करीत आहे.शॉट गन शुटिंग म्हणजे राजा महाराजांचा खेळ, महागडा खेळ ,लाखो किमतीची इम्पोर्टेड बंदूक/किट जवळ नसूनही साधारण किट वापरून अनेक मेडल्स ची लयलूट करणारी हि भारतीय पहिली महिला आहे. आई कविता सामान्य गृहीणी,अवनीचा छोटा भाऊ अर्णव देखील आपल्या बहिणीचाच वसा चालवत आहे.तोही आंतरशालेय जिल्ह्यात प्रथम आणि मुंबई विभागीय स्पर्धा खेळला आहे. अशा या अवनीचे शिक्षण इंडियन मॉडेल स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज उलवे येथे झाले व पुढील शिक्षण वीर वाजेकर कॉलेज फुंडे उरण येथे ती एफ. वाय .बी. एस सी.मध्ये शिकत आहे.अवनी ने सिध्दांत रायफल आणि पिस्तूल शुटिंग क्लब रायगड येथे किशन खारके राष्ट्रीय नेमबाज आणि महाराष्ट्र रायफल असोसिएशन वरळी मुंबई च्या सेक्रेटरी कॉमनवेल्थ मेडलिस्ट श्रीमती शीला कानुगो यांच्या मार्गदर्शनाखाली वयाच्या १२ व्या वर्षी पिस्तूल शुटिंग ची सुरुवात केली. तीने राज्यपातळीवर, झोनल, प्री नॅशनल, आणि नॅशनल शुटिंग स्पर्धेमध्ये ती भारतामधून उरणमधील पहिली विख्यात नेमबाज ठरण्याचा सन्मान तीने मिळवला.अनेकदा जखमी होऊन विजयोत्सवातील मेडल स्वीकारताना जखमेतील रक्त तीच्या मेडल्सना लागले आहे असा तीचा झंझावाती खेळ आहे. सन २०२३ मध्ये तीने डबल ट्रॅप शुटिंग चे शिक्षण छत्रपती स्टेडियम बालेवाडी पुणे येथे रालस्टोन कोयलो आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील टिम मधून आपली खेळातील चमक दाखवून अनेक मेडल्स मिळवले. २०२४-२५ मध्ये महाराष्ट्र च्या दोन टिममध्ये नेत्रदीपक कामगिरी करुन दोन सांघिक महिला व कनिष्ठ महिला असे दोन राष्ट्रीय गोल्ड मेडल मिळवले. अवनी ची गगनभरारी एवढ्या वरच थांबली नाही तर आता तीने आकाशाला गवसणी घातली आहे तीची निवड १४ ऑगस्ट ते २८ ऑगस्ट २०२५ रोजी कझागिस्थान येथे होणाऱ्या आशियाई शुटिंग चॅम्पियन शिप २०२५ ह्या स्पर्धेसाठी. उरण तालुक्यातील दिघोडे ची हि सुवर्ण कन्या अवनी अलंकार कोळी हिची डबल ट्रॅप शॉटगन ज्युनिअर वुमन ह्या नेमबाजी साठी भारतीय संघातर्फे निवड करण्यात आली आहे. रायगड व नवी मुंबई ची पहिली भारतीय संघात निवड झालेली नेमबाज आहे अवनी ने आतापर्यंत अनेक स्पर्धांमधून गोल्ड,सिल्व्हर, ब्राँझ मेडल मिळविले आहेत.तीच्या या नेमबाजी खेळातील दैदिप्यमान कामगिरी बद्दल तीचे कुटुंबिय, शाळा,व समाजातील विविध स्तरांतून तीच्या वर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तिच्या या यशस्वी घोडदौडीसाठी दिघोडे गावचे विद्यमान सरपंच कीर्तिनिधी ठाकूर, तसेच मुसा मेहमूद काझी, साईम झुबेरखान देशमुख, अली रझा सय्यद,IMS उलवे च्या मुख्याध्यापिका गौरी शाह मॅडम या सर्वांचे मोलाचे योगदान आहे.

## पनवेल महानगरपालिकेचा अभिनव उपक्रम

### पनवेल महापालिकेच्या वतीने "आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवी मुक्त दिन" निमित्त पुर्नवापरयोग्य कचरा संकलन केंद्रांचे उद्घाटन





**दैनिक ययुवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

"स्वच्छ भारत अभियान" अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवी मुक्त दिनानिमित्त पनवेल महानगरपालिकेच्यावतीने दिनांक 3 जुलै रोजी नवीन पनवेलमध्ये मिलन सोसायटी, नीलवर्धमान सोसायटी, मेलडी टॉवर या तीन ठिकाणी पुर्नवापरयोग्य प्लास्टिक व ई-कचरा संकलन केंद्रांचे सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. पनवेल महापालिकेच्या वतीने पुर्नवापरयोग्य कचरा संकलन केंद्र उभारणीचा अभिनव उपक्रम राबविला जात असून कचरा वर्गीकरण, पुर्नवापर आणि पर्यावरण संवर्धनास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला आहे. पुढील काळात महापालिकेच्यावतीने विविध ठिकाणी याच पध्दतीने पुर्नवापरयोग्य प्लास्टिक व ई-कचरा संकलन केंद्र उभारण्यात येणार आहे. नागरिकांनी प्लास्टिक कचरा ,ईकचरा, सरसकट घरातील कच-यात न फेकून देता, महापालिकेच्या या पुर्नवापरयोग्य प्लास्टिक व ई-कचरा संकलन केंद्रांमध्ये जमा करावा असे आवाहन घनकचरा व स्वच्छता विभागाचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी केले आहे. पनवेल महापालिकेचा हा अभिनव उपक्रम पर्यावरणपूरक शहराच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल असून नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे. पुर्नवापरयोग्य प्लास्टिक व ई-कचरा संकलन केंद्रांमध्ये संकलित करण्यात येणाऱ्या वस्तू प्लास्टिक कचरा ,ईकचरा, प्लास्टिक कचराः बाटल्या, पिशव्या, कंटेनर, पॅकेजिंग साहित्य, तुटलेली प्लास्टिक उत्पादने ई-कचराः मोबाईल फोन, चार्जर, केबली, बॅटरी, इअरफोन, रिमोट, बल्ब, लहान इलेक्ट्रॉनिक उपकरणे खालील प्रकारचा कचरा या पेट्यांमध्ये टाकू नये:
ओला कचरा, वैद्यकीय कचरा, काच व धातूची वस्तू, मोठी इलेक्ट्रॉनिक उपकरणे, घातक कचरा

## महामार्गावरील अपघातात तरुणाचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**उल्हासनगर/रशीद शेख**

कल्याण मुरबाड सरळगाव महामार्गावर साचलेल्या चिखलावर मोटरसायकल घसरुन झालेल्या अपघातांत एका तरुणांचा मृत्यू झाल्यानें संताप व्यक्त केला जात आहे संबंधित ठेकेदार व महामार्गाची जबाबदारी असलेल्या अधिकाऱ्यावर मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करवा अशी मागणी वाहनचालक व नागरिकांकडून होत आहे रोहन राजेंद्र मलाहा (वय 20 रां जमील नगर भांडुप मुंबई असे प्राण गमावलेल्या तरुणाचे नाव आहे महामार्गाच्या काँक्रिटीकरणाचे काम एक वर्षापासून सुरू आहे रस्त्यावर चिखल झाला आहे या चिखलामुळे मोटरसायक पोरांना आपला जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे हे चित्र रोज ठेकेदार पाहा असतानाही याची कोणतीही दखल घेण्यात येत नाही या तरुणाचा बळी गेल्याने संताप व्यक्त केले जात आहे हा तरुण या महामार्गाने प्रवास करत असताना पांजरा पोळजवळ या तरुणाची मोटरसायकल सिलीप आणि तो जागीच मृत्यू पावला



## गुरुमाली चंद्रभागा फाउंडेशन(रजि.)तर्फे यशवंत केडगे 'सामाजिक कर्तव्यदक्ष पुरस्कार-२०२५ ने सन्मानित

दैनिक युवक आधार
मुंबई (शांताराम गुडेकर)

सोमवारी (३० जून२०२५) रोजी सन्मा.श्री.यशवंत रघुनाथ केडगे (DYSP SDPO LANJA DIST-RATNAGIRI) हे वयानुसार पोलीस दलातून सेवानिवृत्त झाले.सेवानिवृत्त औचित साधुन त्यांनी पोलीस दलात असताना केलेली कामगिरी पाहून गुरुमाली चंद्रभागा फाउंडेशन- गाव गवाणे, तालुका- लांजा,जिल्हा -रत्नागिरी यांच्यावतीने श्री. यशवंत रघुनाथ केडगे(DYSP SDPO LANJA DIST-RATNAGIRI) यांचा "सामाजिक कर्तव्यदक्ष पुरस्कार-२०२५ देऊन सन्मानित करण्यात आले. गुरुमाली चंद्रभागा फाउंडेशन संस्थेचे अध्यक्ष डॉ.चंद्रकांत करंबळे,उपाध्यक्ष श्री.सुभाष रामाणे,महासचिव- अमोल मेस्त्री,खजिनदार श्री.रवींद्र कोटकर यांच्य उपस्थित त्यांची पत्नी,मुले व लांजा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. निळकंठ बगळे साहेब, रत्नागिरी शहरी विभागाचे पोलीस अधिकारी व हवालदार तसेच लांजा तालुक्याचे पोलीस अधिकारी व हवालदार. कर्मचारी वर्ग उपस्थित होते. उच्च न्यायालयाचे कर्मचारी,समाजसेवक श्री.चंद्रकांत चंद्रभागा शिवराम करंबळे हे गुरुमाऊली चंद्रभागा फाउंडेशनच्या प्रयत्नाने रत्नागिरी जिल्हा दिव्यांग समन्वय समितीला आर्थिक मदत,याशिवाय जेष्ठ नागरिक समूहाला पाणी, बिस्कीट वाटप केले जाते.गुरुमाऊली चंद्रभागा फाउंडेशनचे अध्यक्ष समाजसेवक श्री.चंद्रकांत शिवराम करंबळे आणि परिवार व पदाधिकारी, सदस्य, सभासद, हितचिंतक यांच्यातर्फे कोकणात दरवर्षी विविध उपक्रम राबविण्यात येतात.शिक्षण,समाजसेवा, ग्रामसेवा, तंटामुक्त, कृषीसेवा, शेती विकास, कामगार, उद्योग, साहित्य, कला, क्रीडा, ग्रंथपालन, पर्यावरण आदी क्षेत्रात गुरुमाऊली चंद्रभागा फाउंडेशनचे कार्य कौतुकास्पद आहे.फळाची अपेक्षा न ठेवता सतत कार्य करत रहाणे हे गुरुमाऊली चंद्रभागा फाउंडेशनचे अध्यक्ष समाजसेवक श्री. चंद्रकांत शिवराम करंबळे यांचा मूळ उद्देश आहे.गुरुमाऊली चंद्रभागा फॉउंडेशनचे सर्व पदाधिकारी, सदस्य आणि सभासद, हितचिंतक यांचा या सर्व कार्यास मोलाचा सहभाग असतो.




सन्मा. श्री यशवंत रघुनाथ केडगे साहेब DYSP Sdpo Lanja Dist -Ratnagiri यांना गुरुमाऊली चंद्रभागा फाउंडेशनच्या वतीने सामाजिक कर्तव्यदक्ष पुरस्कार देऊन सन्मानित करतानाचा क्षण

## दादरच्या कबूतरखान्यातील अनधिकृत बांधकामावर बीएमसीचा हातोडा.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :मयुर प्रकाश धुरी**

दादर पश्चिम येथील यज्ञेश्वर पुरंदरे चौकात असलेल्या कबूतरखान्यातील अनधिकृत बांधकामावर अखेर महापालिकेने कारवाईची मोहिम हाती घेतली. मुंबई महापालिकेच्या जी - उत्तर विभागाने गुरुवारी सकाळी अचानक धाड टाकत हे बांधकाम हटवले. स्थानिक नागरिकांकडून वारंवार तक्रारी केल्या जात होत्या की कबूतरखान्यात अनधिकृत शेड व इतर संरचना उभारण्यात आल्या होत्या, ज्यामुळे ना केवळ परिसरात अडथळा निर्माण झाला होता, तर स्वच्छतेचाही प्रश्न निर्माण झाला होता. बीएमसीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की संबंधित बांधकामास कोणतीही परवानगी देण्यात आलेली नव्हती आणि त्यामुळे हे बांधकाम त्वरित हटवण्यात आले. कारवाईदरम्यान पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता, मात्र कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.



## दीक्षाभूमी नागपूर येथे दीक्षाभूमीचे सौंदर्यकरण करा

### या मागणीला धरून भव्य धरणे आंदोलन

**दैनिक युवक आधार**
**नागपूर (दीक्षाभूमी )**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नागपूर येथील पवित्र दीक्षाभूमीवर 14 ऑक्टोबर 1956 ला बौद्ध धम्माची दीक्षा घेतली .आज जवळपास 69 वर्ष पूर्ण होत आहेत ..परंतु दीक्षाभूमी या ठिकाणी पाहिजे त्या सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत .आज दिनांक 1 जुलै 2025 ला पत्रकार संजीव भांबोरे यांनी दीक्षाभूमीला प्रत्यक्ष भेट देऊन तेथील मान्यवरांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. यावेळी त्यांनी पोटतिडकेने सांगितले की,आजपर्यंत कोणत्याही प्रकारच्या सौंदर्यकरण झालेलं नाही. जे दीक्षाभूमी येथे सौंदर्य करण होते त्याला विद्रूप करण्यात आले . आणि ही मागणी 2024 पासून सुरू आहे . याबाबत सविस्तर वृत्त असे की,आंदोलन याकरिता की बाहेर देशातून किंवा भारताच्या विविध राज्यातून या ठिकाणी दर्शनार्थ येतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या ठिकाणी धम्मदीक्षा देऊन तथागत गौतम बुद्धाचा धम्म दिला . आणि येथून बुद्धाच्या विचार पवित्र दीक्षाभूमी येथे येणारे पर्यटक प्रेरणा घेऊन जातात. याकरिता बाहेरून येणाऱ्या पर्यटकांना राहण्याची व्यवस्था नाही ,त्यांच्या जेवणाची व्यवस्था नाही , गाड्या पार्किंगची व्यवस्था नाही. या सर्व सुविधा उपलब्ध व्हायला पाहिजे याकरिता 2024 पासून वर्षीपासून आंदोलन सुरू आहे. त्याला एक वर्ष पूर्ण झाले. एक वर्षांपूर्वी देवेंद्र देवेंद्र फडणवीस जे मुख्यमंत्री आहेत त्यांनी सांगितले होते की
आम्ही 24 कोटी खर्च करून सौंदर्य करण आणि विस्तारीकरण करू असे सांगितले.




आणि माता कचेरी यांच्या परिसरातील सहा एकर जागा आणि कॉटन रिसर्च सेंटर यांच्या पाठीमागची 16 एकर जागा अशी 21 एकर जागा दीक्षाभूमीवर येणाऱ्या पर्यटकांसाठी त्यांच्या व्यवस्था करिता देण्याची घोषणा केली होती परंतु ती घोषणा हवेतच विरली. त्यामुळे दीक्षाभूमी येथे एक दिवसीय निदर्शने करण्यात आले. त्याचप्रमाणेअंबाझरी तलाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सांस्कृतिक सभागृह होते ते तोडण्यात आले परंतु ते पुन्हा त्या ठिकाणी उभारण्यात यावं अशी सुद्धा मागणी विशाल आर्यबोधी विजय पाटील भगवान कांबळे, विजय मेश्राम भारतीय बौद्ध महा शाखा सरचिटणीस नागपूर जिल्हा ,इंजिनीयर पद्माकर गणवीर राष्ट्रीय संघटक भारतीय बौद्ध महासभा, विनय डोके भारतीय बौद्ध महासभा संस्कार उपाध्यक्ष नागपूर लक्ष्मीकांत मेश्राम संघटक नागपूर ,डॉक्टर तपशील वासनिक ,आनंद सायरे ,गंगाधर कांबळे ,रावसाहेब पाटील, एडवोकेट व्ही .पी पानतावणे,संघटक नागपूर जिल्हा ,कुंदलता मानोटकर, पपीता खोब्रागडे, व्ही के हिवराडे ,तक्षशिला वाघधरे,प्रतिमा तिरपुडे ,उज्वला गणवीर ,असंख्य बौद्ध उपासक उपासिका यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.

## पारुनगर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सहशिक्षक जिलानी हिप्परगे यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**लातूर प्रतिनिधी**
**मोहम्मद पिंजारी**

मुरुड येथील पारुनगर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सहशिक्षक जिलानी हिप्परगे यांचा सेवानिवृत्ती निमित्त शाळेच्या वतीने सोमवारी (दि. ३०) सत्कार करण्यात आला. विस्तार अधिकारी चंद्रहास म्हेत्रे अध्यक्षस्थानी होते. डीडीएन एसएफए लिमिटेडचे चेअरमन दिलीपदादा नाडे, समाज जागृती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बी. एस. पटाडे, सरपंच अमृता नाडे व उपसरपंच हनुमंतबापू नागटिळक यांची प्रमुख उपस्थिती होती.
जिलानी हिप्परगे यांनी प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन कुटुंबालाही शिक्षित केले व सामुदायिक विवाह सोहळ्यातून समाजासाठी भरीव योगदान दिल्याचे नाडे यांनी सांगितले. शिक्षणाची खरी ताकद हिप्परगे परिवाराने दाखवून दिल्याचे नागटिळक यांनी नमुद केले. श्री. पटाडे, मुख्याध्यापक हेमंत जोशी, मुस्लिम विकास परिषदेचे प्रदेशाध्यक्ष साहेबअली सौदागर, जिल्हाध्यक्ष कलीम पटेल, निदा हिप्परगे, नंदूरबारच्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या सहायक प्रकल्प अधिकारी सायराबानू हिप्परगे यांनी जिलानी हिप्परगे यांच्या व्यक्तिमत्वाची माहिती दिली. सत्काराला उत्तर देताना हिप्परगे यांनी सेवा कालावधीत सहकार्य केलेल्यांचे ऋण व्यक्त करत आठवणींना उजाळा दिला. या वेळी हिप्परगे यांच्या पत्नी नुजहत परवीन हिप्परगे व परिवारातील लाडलेसाहेब हिप्परगे, उस्मान हिप्परगे, हजरा हिप्परगे, फैजान हिप्परगे, साहिल हिप्परगे, असिफ हिप्परगे यांच्यासह माजी सरपंच जयश्री पांगळ, ग्रामपंचायत सदस्य सुरज सूर्यवंशी, शालेय व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा पूजा निकम यांच्यासह शिक्षक, शिक्षिका व नागरिक उपस्थित होते. मंगल नाईकनवरे यांनी प्रास्ताविक केले. छाया पुरी यांनी सुत्रसंचालन करुन आभार मानले.




## अल्पवयीन तरुणीला अज्ञात इसमाने नेले फुस लावुन पळवून

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर )**



पनवेल शहरातील कोळीवाडा परिसरात राहणाऱ्या १६ वर्षीय अल्पवयीन तरुणीला अज्ञात इसमाने फुस लावुन पळवून नेल्याची घटना घडली आहे . स्वाती श्रीविलास निर्मल (वय १६ वर्षे ११ महिने) , उंची ५ फुट ३ इंच, रंग-गोरा, चेहरा-गोल, बांधा सडपातळ, केस काळे, नाक-सरळ, डाव्या गालावर तिळ, अंगात-काळया रंगाची कुर्ती, काळया रंगाचा पायजमा, पायात काळया रंगाची पावसाळी चप्पल, भाषा मराठी हिंदी बोलणारी आहे . या तरुणीबाबत अधिक माहिती असेल त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक किरण राऊत यांच्याशी संपर्क साधावा .

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## श्री देव विठ्ठल पाचमाडकर मंदिर खेंड – चिपळूण, जीर्णोद्धारानंतर प्रथमच मंदिर दर्शनासाठी खुले
# ६ जुलै रोजी आषाढी एकादशी उत्सव थाटात साजरा होणार....

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार**
**चिपळूण प्रतिनिधी**

चिपळूण शहरातील – खेंड विभागातील श्रद्धास्थान असलेल्या श्री देव विठ्ठल पाचमाडकर मंदिराचा जीर्णोद्धार पूर्ण होऊन मंदिर प्रथमच दर्शनासाठी भक्तांसाठी खुले करण्यात आले आहे. १२५ वर्षांच्या इतिहास असलेल्या या मंदिरात यंदाची आषाढी एकादशी रविवारी दिनांक ६ जुलै २०२५ रोजी मोठ्या उत्साहात आणि थाटामाटात साजरी केली जाणार आहे. श्री विठ्ठल–रुक्मिणीच्या कृपेने आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने मंदिराचे बांधकाम नव्याने पूर्ण झाले आहे. मंदिराच्या नव्या रूपात विठ्ठलाच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री देव विठ्ठल पाचमाडकर मंदिर मंडळ, खेंड (ता. चिपळूण) यांच्यातर्फे करण्यात आले आहे. उत्सवानिमित्ताने मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम, कीर्तन, भजन, पालखी सोहळा आयोजन हे कार्यक्रम होणार आहे. मंदिराचा नव्या स्वरूपातील भव्य नकाशा आणि रचना भक्तांना वेगळाच आध्यात्मिक अनुभव देणारी ठरणार आहे. सदर उत्सवासाठी अध्यक्ष व सदस्य, श्री देव विठ्ठल पाचमाडकर मंदिर मंडळ, खेंड(ता. चिपळूण) यांनी भाविकांना प्रेमपूर्वक निमंत्रण दिले आहे. श्री विठ्ठल रखुमाईच्या जयघोषात, या आषाढी एकादशीला भक्तीमय वातावरणात आपण सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



# पिलीव नगरीला वारकऱ्यांच्या आगमनाने आले प्रति पंढरपूरचे स्वरूप"

**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी**

**(रघुनाथ देवकर):** –अक्कलकोट संस्थानचे व सोलापूर सांगली सातारा जिल्ह्याच्या सरहद्दीवर असणारे ऐतिहासिक वारसा सांगणारे पिलीव हे गाव, या गावांमध्ये नेहमीच धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक वारसा जोपासला जातो. पिलीव हे गाव पंढरपूरच्या अगदी काही अंतरावर असून या पिलीव नगरीमध्ये सांगली सातारा जिल्ह्यातून एवढेच काय महाराष्ट्रातील अनेक ठिकाणाहून साधुसंत ,महाराज यांच्या दिंडी व पालखी सोहळ्यांचे आषाढी वारीच्या निमित्ताने पिलीव नगरीमध्ये आगमन झाले असून या सोहळ्याचे पिलीव नगरीमध्ये आगमन होताच असंख्य भाविक भक्तांनी मोठ्या भक्ती भावाने फटाक्याच्या आतषबाजीत व तोफांच्या सलामी तर काहींनी सडामार्जन करून



संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज व संतश्रेष्ठ श्री सोपानकाका महाराज भेट

"ज्ञानोबा तुकाराम"च्या जयघोषामध्ये अतिशय आनंदाने व कौतुक भरल्या नजरेने स्वागत केले. या सोहळ्यामध्ये श्री गोरक्षनाथ महाराज ३२ शिराळा, सेवागिरी महाराज पुसेगाव, दादा महाराज सातारकर बाबा महाराज सातारकर ,संत गाडगे महाराज, संत शेकोबा दादा महाराज, श्री गोंदवलेकर महाराज, संत बाळूमामा, साईबाबा, यशवंत बाबा, विसापूर, विहापूर, इंचगिरी महाराज, कोटेश्वर महाराज, अण्णा महाराज रेवडेकर (गोवे) अशा अनेक साधुसंतांचे व महाराजांचे पालखी सोहळे व दिंडी सोहळे पिलीव मुक्कामी ग्रामपंचायत कार्यालय मारुती मंदिर, महादेव मंदिर ,श्रीराम मंदिर श्री संत सेनामहाराज मंदिर, खडीचा महादेव मंदिर ,खंडोबा मंदिर नाईक गल्ली ,कर्मवीर विद्यालय ,जवाहर विद्यालय, हरिहर मठ, साठे नगर शाळा, विविध प्राथमिक शाळा अशा अनेक ठिकाणी अनेक दिंडी व पालखी सोहळे टाळ मृदुंगाच्या गजरात खांद्यावरती भगव्या पताकी घेऊन "विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल"या नामस्मरणात कपाळी गंध, हाती टाळ –वीणा, वारकरी पोशाख घालून, अश्वासहीत अनेक प्रकारच्या पुष्पमालांनी सजवलेल्या रथासहित दाखल झाले होते. पिलीवकरांनी, सर्वांनी ज्याच्या त्याच्या पद्धतीने सेवा देण्याचा प्रयत्न केला. यावेळी पिलीव व परिसर भक्तीमय वातावरणात अक्षरशः न्हावून निघाला होता .आणि खरोखरच पिलीव नगरीला प्रति पंढरपूरचे स्वरूप प्राप्त झाल्याचे प्रत्यक्षात दिसत होते. या कालावधीत भजन ,कीर्तन प्रवचन ,भारुड, गवळणी, समाज प्रबोधनाचे कार्यक्रम सर्वांना पाहायला मिळाले. काही अंतरावरच श्रीक्षेत्र पंढरपूर आल्याने वारकरी बांधवांच्या मुखावर श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनाचा आनंद दिसून येत होता. या दिंडी सोहळ्यासाठी पिलीव येथील सर्व घटकांनी अतिशय चांगल्या प्रकारचा प्रतिसाद देऊन सेवा बजावल्याचे दिसून आले. पिलीव नगरीच्या स्वागत समारंभाने सर्व पालखी सोहळे व दिंडी सोहळे भारावून गेले होते. यांचे स्वागत समारंभ उरकून सर्व दिंडी सोहळे, पालखी सोहळे श्री क्षेत्र पंढरपूर कडे टाळ मृदुंगाच्या गजरात ज्ञानोबा तुकारामच्या जयघोषा मध्ये आनंदाने जात असल्याचे दिसून आले.

# विजय नेमाडे'योग रत्न'पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**संभाजीनगर प्रतिनिधी-**
**गुरुनाथ तिरपणकर**

निरोगी आणि सुदृढ जीवन जगण्यासाठी योगा करणे हे आवश्यकच आहे.यासाठी योग कला शिकविली जाते. महाराष्ट्रात योगाचे शिक्षण देणारे बरेच योग शिक्षक आहेत.अशा योग शिक्षकांचा सर्व थरातून सत्कार, सन्मान होत असतो.त्याच अनुषंगाने योगाचे अभ्यासक परमपूज्य हठयोगी निकम गुरुजी संस्थापित श्री अंबिका योग ठाणे, निस्वार्थीपणे सेवा देणारे बदलापूर शाखेचे संचालक विजय नेमाडे यांना नुकताच योग रत्न पुरस्कार प्रदान करुन सन्मानित करण्यात आले.हा पुरस्कार आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन,ए जी एम एस व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी(अजित दादा पवार गट) डॉक्टर सेल आयुष विभागाच्या वतीने उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण नाट्यगृह संभाजीनगर येथे देण्यात आला.या पुरस्कार सोहळ्याला




राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी डॉक्टर सेलचे प्रदेश अध्यक्ष डॉ.बाळासाहेब पवार हे कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच उद्योजक मनोज दांडगे, डॉ.नितीन राजे पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी डॉक्टर सेल प्रदेश कार्याध्यक्ष(आयुष विभाग) डॉ.सतिश कराळे, डॉ.बाबुराव कानडे,दिशा चव्हाण, प्रशांत सावंत,प्रा.कुणाल महाजन, मनोहर कानडे व इतर आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते.विजय नेमाडे यांना योगरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

# खारघरमध्ये पडलेले झाड हटवून वाहतूक सुरळीतः रमझान शेख यांचा तत्पर हस्तक्षेप

**दैनिक युवक आधार**
**खारघर वार्ताहर**

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे शहरात अनेक ठिकाणी अडथळे निर्माण झाले आहेत. खारघर सेक्टर ३४ मधील एका मुख्य रस्त्यावर झाड कोसळल्याने वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. या घटनेची तात्काळ दखल घेत राष्ट्रवादी काँग्रेस–शरदचंद्र पवार पक्षाचे नेते रमझान शेख यांनी तत्परतेने हस्तक्षेप करत वाहतूक पूर्ववत करण्यात मोलाची भूमिका बजावली. वाहतूक कोंडीमुळे परिसरातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. रमझान शेख यांनी तातडीने पनवेल महानगरपालिका प्रशासनाशी संपर्क साधला. त्यांच्या विनंतीला प्रतिसाद देत पालिका अधिकारी कुणाल गायकवाड यांच्या नेतृत्वाखालील टीमने त्वरित



घटनास्थळी धाव घेतली. आवश्यक मनुष्यबळ आणि साहित्याच्या सहाय्याने काही तासांतच कोसळलेले झाड हटवण्यात आले आणि रस्ता वाहतुकीसाठी मोकळा झाला. या त्वरित कार्यवाहीबद्दल स्थानिक नागरिकांनी रमझान शेख, पनवेल महानगरपालिकेचे अधिकारी कुणाल गायकवाड, ओमकार गायकर आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे आभार मानले. नागरिकांच्या समस्यांकडे संवेदनशीलतेने लक्ष देऊन तात्काळ उपाययोजना करणारे रमझान शेख यांचे कार्य लोकप्रतिनिधींच्या कर्तव्याची प्रेरणादायी मिसाल ठरले आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्ष पदार्पणनिमित्त 13 जुलैला रक्तदान शिबिर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी )**

दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५ व्या वर्षात पदार्पण अर्थात अमृत महोत्सव वर्षनिमित्त युवा मोर्चाच्यावतीने दर महिन्याच्या पहिल्या रविवारी रक्तदान शिबिर उपक्रम राबविण्यात येत आहे या रविवारी आषाढी एकादशी असल्याने सदरचे शिबिर रविवार दिनांक १३ जुलै रोजी खारघर येथे होणार आहे. भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने रायगड जिल्ह्यातील रक्ततुटवडा भरून काढण्यासाठी एक विशेष "रक्तदान उपक्रम" सुरु करण्यात येत आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्ष पदापर्णानिमिताने विविध समाजोपयोगी कार्यक्रम राबविण्यात येत आहेत, त्या अनुषंगाने दर महिन्याच्या पहिल्या रविवारी भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात येणार आहे. हा उपक्रम संपूर्ण वर्षभर राबविण्यात येणार असून, विशेषतः थॅलेसिमिया ग्रस्त रुग्णांसाठी आणि इतर गरजू रुग्णांसाठी या रक्तदान उपक्रमाचे मोठे योगदान ठरणार आहे. ०६ जुलै रोजी आषाढी एकादशी असल्याने अनेक भक्तगण पंढरपूरच्या वारीला जात आहे. त्यामुळे या दिवशी आयोजित करण्यात आलेले रक्तदान शिबीर पुढील रविवारी होणार आहे, अशी माहिती खारघर युवा मोर्चाचे अध्यक्ष नितेश पाटील यांनी दिली आहे.



दैनिक युवक आधार – बीड जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी म्हणून श्रीमती प्रियाराणी पाटील मॅडम यांचा सत्कार करताना. क्रांतिकारी शिक्षक संघटनेचे सचिव शाहीद कादरी सर असरार खान सर, अजीज राजा सर, ताजोदिन सर, प्रा.डॉ.शशिकांत गायकवाड सर, चव्हाण सर, वडमारे सर यांच्या सह इतर
**(छाया- शेख महेशर ताहेर पाटोदा.)**

# पनवेल जवळील नावडे येथे ८ जुलै रोजी मा आम. दत्तूशेठ पाटील यांच्या पुतळ्याचे अनावरण.

**दैनिक युवक आधार**
**पनवेल /प्रतिनिधी.**

पनवेल जवळ नावडे येथील रयत शिक्षण संस्थेचे परशुराम जमा म्हात्रे विद्यालय व आत्माराम धोंडू मात्रे जुनिअर कॉलेज व आयटीआय या ठिकाणी माजी आमदार दत्तूशेठ पाटील ( माजी उपाध्यक्ष रयत शिक्षण संस्था सातारा ) यांच्या स्मारक व पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण ८ जुलै २०२५ रोजी सकाळी ११. ०० वाजता माजी केंद्रीय कृषिमंत्री तथा रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस माजी आमदार जयंतभाई पाटील उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती कोकण शिक्षक मतदार संघाचे




माजी आमदार बाळाराम पाटील यांनी दिनांक ४ जुलै २०२५ रोजी नावडे हायस्कूल येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत सांगितली.

या पत्रकार परिषदेला पंचायत समितीचे माजी सभापती काशिनाथ पाटील, काँग्रेसचे पनवेल जिल्हा अध्यक्ष सुदाम पाटील, पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती डॉक्टर, पनवेल महानगरपालिका चिटणीस प्रकाश म्हात्रे, पत्रकार माधव पाटील, पंढरीनाथ पाटील, मोहन गंधारकर आदी मान्यवर उपस्थित होते. आमदार बाळाराम पाटील यांनी पुढे सांगितले सदर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी , रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. भगीरथ शिंदे, रयत शिक्षण संस्थेचे सचिव विकास देशमुख,रयत शिक्षण संस्थेचे संघटक डॉ. अनिल पाटील, माजी विधान परिषद सदस्य श्रीकांत देशपांडे, माजी विधान परिषद सदस्य दत्तात्रय सावंत आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

माजी आमदार दत्तूशेठ पाटील यांची माहिती देताना आम बाळाराम पाटील यांनी सांगितले ते पनवेल उरण मतदार संघामधून १९७९ , १९८५, आणि १९९० , असे सलग तीन वेळा विधानसभेचे आमदार म्हणून भरघोस मतांनी निवडून आले. आगरी समाजाला ओबीसी आरक्षण मिळवून देण्यात तात्यांचे मोलाचे योगदान आहे,तात्यांचे पनवेल आणि उरण परिसरातील शेतकरी कामगार पक्षासाठी मोठे योगदान राहिले आहे, त्यांनी आणि त्यांच्या सहकार्याने रयत शिक्षण संस्थेचे रोपटे आणले आणि त्याची वाढ केली. या परिसरात शिक्षणाची गंगा आणण्याचं मोठं काम त्यांनी केलं, राजकीय क्षेत्रामध्ये त्यांनी आपला उत्तराधिकारी म्हणून विवेक पाटील यांना विधानसभेत पाठवले. आणि तात्यांची आरोग्याची सेवा आपले वडील समजून पनवेल मधील डॉक्टर गिरीश गुणे विशेष सेवा केली.

# मोबाईल फोन जबरी चोरी करणारे सराईत गुन्हेगारांस खांदेश्र्वर पोलिसांनी केले गजाआड

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, वार्ताहर**

मोबाईल फोन जबरी चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास खांदेश्र्वर पोलिसांनी गजाआड करून त्याच्याकडून चोरीचे मोबाईल हस्तगत केले आहेत. नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिसरात होत असलेल्या मोबाईलफोन जबरी चोरीच्या गुन्हयाना आळा घालण्यासाठी पोलीस आयुक्त मिलींद भारंबे व पोलीस सह आयुक्त संजय एनपुरे, अप्पर पोलीस आयुक्त दिपक साकोरे तसेच पोलीस उपायुक्त, परि 02, पनवेल प्रशांत मोहिते, सहा पोलीस आयुक्त, भाउसाहेब ढोले यांनी



वेळोवेळी केलेल्या सुचना नुसार खांदेश्र्वर पोलीस ठाणे काही गुन्हे दाखल झाले होते. त्यानुसार वपोनि श्रीमती स्मिता ढाकणे, पोनि (गुन्हे) सचिन परदेशी यांच्या सुचनेनुसार गुप्त बातमीदारांच्या प्राप्त माहीती वरून वर नमूद गुन्हे करणारे आरोपी नामे जयेश सुरेश कांबळे वय 21 वर्षे, रा, आदईगाव ता. पनेवल व त्याचा सहकारी विनायक संतोष जाधव वय 19 वर्षे, आकुर्ली ता. पनेवल यांना सेक्टर 19, नवीन पनवेल येथून सापळा कारवाई करून शिताफिने ताब्यात घेवून अटक करण्यात आली आहे. नमूद आरोपीताकडे केलेल्या तपासात आरोपी कडून गुन्हयातील जबरीने चोरी करून नेलेले एकूण 4 मोबाईल फोन व गुन्हयासाठी वापरलेली एक ॲक्टीव्हा मोटार सायकल असे एकूण 77,600/– किंमतीचा माल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपींकडून खांदेश्र्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोबाईल फोन चोरीचे तीन गुन्हे उघडकीस आले आहेत.

सदरची कारवाई पोलीस उपायुक्त, प्रशांत मोहिते, परि 02, पनवेल व सहा. पोलीस आयुक्त भाउसाहेब ढोले, पनवेल विभाग तसेच वपोनि श्रीमती स्मिता ढाकणे, पोनि (गुन्हे) सचिन परदेशी, खांदेश्र्वर पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली खांदेश्र्वर पोलीस ठाणेचे सपोनि प्रताप बंडगर, शरद बरकडे, पोहवा महेश कांबळे, उदय देसाई, रणजित पाटील, धिरेंद्र पाटील, पोशि विकास कामनुकर, युवराज शिवगुंडे, सचिन पवार, स्वप्निल कोळी, संदीप तरटे, नाझीरकर, परदेशी यांनी केली आहे. सदर गुन्हयाचा तपास सपोनि बंडगर करीत आहेत.

# एक पेड माँ के नाम हे कार्यक्रम ईस्लापूर येथील सावरकरनगर येथील प्राथमिक शाळेत राबवण्यात आला .

**दैनिक युवक आधार**
**किनवट प्रतिनिधी**
**विशाल भालेराव**

एक पेड माँ के नाम" या कार्यक्रमांतर्गत ता .४ जुलै रोजी जि .प .प्रा. शाळा सावरकरनगर येथे वृक्षारोपण करण्यात आले व तसेच मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थी /पालकांना पन्नास वृक्ष वाटप करण्यात आले. याप्रसंगी ईस्लापूर येथील वनपरीक्षेत्र अधिकारी सचिन धनगे, यांच्या मार्गदर्शनानुसार येथील कार्यक्रमात कर्मचारी यांनी सहभाग नोंदवत पर्यावरणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.... झाड आई प्रमाणे असून माय व लेकराच्या संबंधासारखे आहे. आजच्या काळात वनाची मोठ्या प्रमाणात तोड होत आहे आशात पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षाचे संवर्धन करणे संतुलन राखणे वृक्षाची जोपासना करणे हे आज प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य बनले आहे.

असे मत याप्रसंगी वन विभागाच्या कर्मचारी श्रीमती शीला केंद्रे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमास वनपाल व्ही ,एस . गुद्दे ,आर.



बी .कोलते. दिपाली सोनाळे, फिरते पथक चे वनपाल एन एस काजे ,वनरक्षक नागरगोजे ' केंद्रेमॅडम , कुडमते मॅडम,खंनपट्टे मॅडम ,वनरक्षक मुंडे , डोईफोडे ,'वनमजूर उत्तम पवार, वनमजूर उत्तम जाधव , झडगे वनरक्षक वनविभागातील अन्य वनरक्षकांची उपस्थिती होती. इस्लापूर येथील माजी सरपंच देविदास पळसपुरे ' शाळेचे मुख्याध्यापक अडबलवार मॅडम इर्शाद पांडे, पत्रकार परमेश्वर पेशवे, प्रमोद जाधव, सुगाजी हाडे, गोपनीय शाखेचे मडावी , जगदीश हनवते, त्यांच्यासह विद्यार्थी व पालक यांनी या कार्यक्रमांमध्ये सहभाग नोंदवला होता.

## चितेगाव येथील खुन प्रकरणातील बेपत्ता संशयीताचा मृतदेह आढळल्याने खळबळ,

### शेख अकबर महेबुब उर्फ मियाभाई शेख यांचा मृतदेह दादेगाव शिवारात आढळल्याने एकच खळबळ.



**दैनिक युवक आधार**
**मराठवाडा विभाग,**
**पैठण प्रतिनिधी गौतम सोनवणे.**

पैठण तालुक्यातील चितेगाव येथील एका खुन प्रकरणातील संशयीत आरोपी अकबर महेबुब उर्फ मियाभाई शेख यांचा मृतदेह पैठण तालुक्यातील दादेगाव शिवारात आढळुन आला आहे.या घटनेमुळे चितेगाव परिसरात एकच खळबळ उडाली आहे.या घटनेची माहीती मिळताच अप्पर पोलीस अधिक्षक अन्नपुर्णा सिंह,उपविभागीर पोलीस अधिकारी डॉ.सिध्देश्वर भोरे,पोलिस निरिक्षक महादेव गोमारे,सपोनी निलेश शेळके यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता हा प्रकार घातपात झाला का? या संदर्भात पोलिसांनी तपास सुरु केला आहे.याबाबत अधिक माहिती अशी आहे की,पैठण तालुक्यातील चितेगाव येथील एका खुन प्रकरणातील आरोपी असलेले शेख अकबर महेबुब उर्फ मियाभाई महेबुब शेख वय (५०) वर्ष हे कार क्र.एमएच २० बिन ४४८८ ने पंढरपुर येथे गेले होते.परंतु त्यांच्याशी घरच्यांनी फोनवरुन संपर्क केला असता फोन उचलला नाही.त्यामुळे नातेवाईकांनी दि.३०/६/२०२५ रोजी बिडकीन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती.शेख यांचे दोन मोबाईल फोन ढोरकीन गावाच्या परिसरात आढळुन आले.दि.१/७/२०२५ रोजी पैठण तालुक्सातील दादेगाव परिसरातील एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह असल्याची माहीती पैठण पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक महादेव गोमारे यांना मिळाली त्यानंतर पोलीसांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली,त्यावेळी कार घटनास्थळी आढळुन आली नाही. त्यामुळे हा प्रकार घातपात आहे का? या संदर्भात पोलीसांनी तपास सुरु केला आहे.

# केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचे पँथरप्रेम नॅशनल पार्क मधील पँथर सोबत दलित पँथर

### केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी सलग ७ वर्षे वन्यप्राणी योजनेतून बिबळ्या वाघ पँथर दत्तक घेण्याचा केला विक्रम

**दैनिक युवक आधार**
**पनवेलः(आनंद पवार)**

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी आज बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात वन्यप्राणी दत्तक योजनेतून बिबळ्या वाघ पँथर दत्तक घेतला. वन्यप्राणी योजनेतून सलग ७ वर्षे बिबळ्या वाघ दत्तक घेण्याचा विक्रम ना. रामदास आठवले यांनी केला. नॅशनल पार्क मधील बिबळ्या वाघ पँथर सोबत दलित पँथर रामदास आठवले यांना पाहून उपस्थितांना नेत्रसुखद अनुभव लाभला.मूळचे दलित पँथर चळवळीचे पँथर रामदास आठवले हे समग्र आंबेडकरी चळवळीला भावलेले नेतृत्व आहे.



रामदास आठवले यांनी ही आपल्या मनात दलित पँथर चळवळ जोपासली असून पुन्हा नव्याने दलित पँथर उभी करण्याचा त्यांचा मानस आहे. दलित पँथर रामदास आठवले यांचे हे पँथर प्रेम दलित पँथर चळवळीवरील अतूट प्रेमाचे प्रतीक आहे.तसेच ते वन्यप्राण्यांचे संरक्षण करा; मुक्या प्राण्यांवर प्रेम करा वन्य जीवांचे रक्षण करून निसर्गातील अन्नसाखळी अवधीत ठेवण्याचे निसर्गावर प्राणिमात्रांवर प्रेम करण्याचा संदेश देण्यासाठी ना.रामदास आठवले दरवर्षी पँथर दत्तक घेतात. यावेळी ना.रामदास आठवले यांच्या पत्नी सौ. सीमाताई आठवले पुत्र जीत आठवले, वनसंरक्षक संचालक अनिता पाटील,उपवनसंचालक रेवती कुलकर्णी
दहिसर चे रिपाइं तालुका अध्यक्ष दिलीप व्हाव्हळे,रिपाइं युवक आघाडी चे महाराष्ट्र अध्यक्ष पप्पू कागदे, जिल्हा अध्यक्ष रमेश गायकवाड,आदी अनेक मान्यवर उपस्थित होते. बिबळ्या वाघ दत्तक योजनेत वर्षभरासाठी १लाख २० हजार रुपये खर्च येतो. हा खर्च दरवर्षी ना.रामदास आठवले हे वनविभागाला सुपूर्द करत असतात. पँथर रामदास आठवले यांनी दत्तक घेतलेल्या बिबळ्या वाघ पँथरचे नाव सिंबा ठेवण्यात आले आहे.पँथर रामदास आठवलेंचा आवाज दत्तक घेतलेला सिंबा हा पँथर ओळखतो की काय असे आश्चर्य वाटावे असे नेहमी आठवलेंनी सिंबा ला आवाज दिल्यावर पँथर सिंबा थांबतो. त्यांच्याजवळ येतो. पँथर चे पँथरशी असलेले प्रेम पाहून उपस्थित भारावून जातात अशी माहिती प्रत्यक्षदर्शी हेमंत रणपिसे यांनी दिली आहे.

## चौभा नि.रुई व नांदा या परिसरामध्ये बिबट्या आढळून आल्याने वन विभागाकडून काळजी विषयी माहिती

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी**
**मारुती सत्रे**

घरगुती पाळीव कुत्रे व शेतकरी यांच्या म्हशीच्या पिल्ला वरती हल्ल्यानंतर,वन विभाग अधिकाऱ्या कडून काळजी घेण्याचे दिले निर्देश.

बिबट्यापासून संरक्षणासाठी घ्यावयाची काळजी

1. रात्रभर घराबाहेर न फिरणे
संध्याकाळीनंतर व रात्रीच्या वेळी शेतात किंवा जंगलाच्या दिशेने जाणे टाळावे.
पशुधन रात्रभर सुरक्षित जागी बंदिस्त ठेवावे.
2. गटानेच हालचाल करावी
एकटे जंगल भागात जाऊ नये. शक्यतो 3–4 जणांच्या गटातच जावे.
मोबाईल/शिटी/टॉर्च बरोबर ठेवावेत.
3. बालकांची काळजी घ्यावी
लहान मुलांना एकटे घराबाहेर जाऊ देऊ नये.
शाळेच्या वेळेस पालकांनी सोबत न्यायचे नियोजन करावे.
4. पशुधन सुरक्षिततेची खबरदारी
गुरे ढोरे रात्रभर मोकळ्या जागी बांधू नयेत.
शक्य असल्यास वासरांना झोपडीत बंदिस्त ठेवावे.
5. अन्न उघड्यावर टाकू नये
कुत्र्यांसाठी किंवा इतर प्राण्यांसाठी अन्न खुले ठेवल्यास बिबट्याचे आकर्षण होऊ शकते.

महत्वाचे क्रमांक
वन विभाग आपत्कालीन संपर्क: [वन परिक्षेत्र अधिकारी क्रमांक]
स्थानिक पोलीस ठाणे: [क्रमांक]
ग्रामपंचायत सचिव,सरपंच,उपसरपंच इतर अधिकाऱ्यांना कळवावे

बिबट्या आढळल्यास काय करावे?
आरडाओरड न करता शांत राहावे.
स्वतः कोणतीही हालचाल न करता सुरक्षित ठिकाणी जावे.
ह्या उपाययोजनांमुळे बिबट्याच्या हल्ल्याचा धोका कमी करता येतो व माणसांचे आणि प्राण्यांचे जीव वाचू शकतात.

## रसायनी परिसरातील सर्व राष्ट्रीयकृत बँकांनी मराठी भाषेचा वापर व व्यवहार करावा मनसेची मागणी!

**अन्यथा उग्र आंदोलन छेडू:दिपक कांबळी**

**दैनिक युवक आधार**
**रसायनी:(आनंद पवार)**

केंद्र सरकारने मराठी भाषेला २०२४ला अभिजात भाषेचा दर्जा दिला असताना सुद्धा अनेक राष्ट्रीयकृत बँकांमध्ये मराठीमध्ये कामकाज होताना दिसत नसल्याची खंत मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रतिनिधींशी बोलताना व्यक्त केली. मराठीचा मान आपण सर्वांनी योग्य प्रकारे राखणे आवश्यक आहे.त्या अनुषंगाने मनसेचे अध्यक्ष राज साहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार रसायनी परिसरातील सर्व राष्ट्रीयकृत बँकांना महाराष्ट्र नवनिर्माण सेने तर्फे निवेदन देण्यात आले असून बँकांमध्ये मराठी भाषेचा वापर आणि व्यवहार व्हावा असा सल्लाही मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी बँकेच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना यावेळी दिला
आपल्या आस्थापनामध्ये आपले पदाधिकारी व कर्मचारी यांनी सर्व व्यवहार मराठी मध्ये करावा.
अन्यथा मनसे तर्फे उग्र आंदोलन छेडले जाईल असा इशाराही मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे
याप्रसंगी मनसेचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष दीपक कांबळी, खालापूर पंचायत समिती विभाग अध्यक्ष प्रशांत खरात,माजी पं.स.अध्यक्ष भास्कर डुकरे,मनोज जाधव, संजय पाटील आदी उपस्थित होते.

# अखेर मुहूर्त सापडला निळजे काटई पूल राहादारीसाठी मोकळा.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी (कल्याण ग्रामिण)**
**रमेश राऊत**

डोंबिवली दि.५:-बऱ्याच वर्षापासून प्रलंबित असलेला निळजे काटई रेल्वे पूल अखेर नागरिकांसाठी खुला करण्यात आला आहे. बऱ्याच वेळा पूल रहदारीसाठी खुला करण्याच्या तारखा देऊनही रहदारीसाठी खुला करण्याचा मुहूर्त येत नव्हता. आज अखेरीस ४/७/२५ रोजी पूल रहदारीसाठी खुला करण्याचा मुहूर्त सापडला कोणतीही पूर्वकल्पना न देता पूल रहदारीसाठी मोकळा करण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष श्री.गोपाळ लांडगे, महिला जिल्हाप्रमुख सौ.लताताई पाटील, माननीय आमदार श्री.राजेश मोरे, श्री. अर्जुन पाटील, श्री.रोहिदास म्हात्रे, श्री. महेश पाटील,दीपेश पाटील, श्री. बाबुराव पाटील, श्री. जितेंद्र पाटील, श्री. सुंदर अलीमकर यांच्यासह शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी तसेच बरेचशे



कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा पुल रहदारीसाठी मोकळा झाल्याने आजूबाजूच्या गावातील नागरिकांनी समाधान व्यक्त करत प्रशासनाचे आभार मानले आहे, या रस्त्यावर नागरिकांना प्रवास करताना कल्याण फाटा ते निळजे (पलावा) पर्यंत जाण्यासाठी तासान तास ट्रॅफिक मध्ये उभे राहावे लागत होते.

एकीकडे निळजे, काटई आणि आजूबाजूच्या परिसरातील गावातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले तर दुसरीकडे कल्याण फाटा सर्कल वरील ट्रॅफिकचे समस्या कधी दूर होईल असा सवाल शिळ डायघर गावातील ग्रामस्थांनी प्रशासनाला विचारला आहे, कल्याण फाटा सर्कल येथे सुद्धा सकाळी नऊ वाजल्यापासून ते रात्री बारा वाजेपर्यंत दररोज ट्रॅफिक जाम असते यावर सुद्धा माननीय खासदार आणि माननीय आमदार लक्ष देतील का?असा सवाल शिळ डायघर येथील नागरिकांनी प्रवाशांनी तसेच चालक वर्गाने उपस्थित केला आहे.

# कृषिदिनी खरेदी-विक्री संघातर्फे शेतकऱ्यांचा सन्मान

### माजी मंत्री पुरके यांची उपस्थिती; राळेगाव येथे कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधीः-**
**जितेंद्र खोडे**

**राळेगावः-** हरित क्रांतीचे प्रणेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीचे व कृषीदिनाचे औचित्य साधून, राळेगाव येथील खरेदी-विक्री संघाच्या कार्यालयात दोन प्रगतशील शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. राज्याचे माजी शिक्षणमंत्री प्रा. वसंतराव पुरके यांच्या हस्ते हा सत्कार सोहळा मंगळवारी, दि.१ जुलै रोजी पार पडला.कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रा. वसंतराव पुरके यांनी स्व. नाईक



यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन केले. त्यानंतर, कृषी क्षेत्रातील योगदानाबद्दल श्रीरामपूर येथील शेतकरी बाबाराव येरेकर आणि राळेगाव येथील शेतकरी प्रभाकर जुनगरे यांचा शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन प्रा. पुरके यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी बोलताना प्रा. पुरके यांनी, वसंतराव नाईक यांनी शेतकरी आणि जनसामान्यांसाठी केलेल्या कार्याचे स्मरण करून दिले आणि आज देशाला त्यांच्यासारख्या दूरदृष्टीच्या नेत्यांची गरज असल्याचे मत व्यक्त केले.या कार्यक्रमाला काँग्रेस ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष इंजिनिअर अरविंद वाढोणकर, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष मिलिंद इंगोले, तालुका काँग्रेस अध्यक्ष राजेंद्र तेलंगे,शहराध्यक्ष प्रदीप ठुणे, भरत पाल, श्रावणसिंग वडते, अशोक काचोळे, श्रीधर थुतुरकर, महादेव मेश्राम,बाळासाहेब दरणे, सदानंद भोरे,अंकुश मुनेश्वर,सुधीर जवादे,वैकुंठ मांडेकर,मंगेश पिंपरे, शुभम चिडाम,प्रफुल्ल तायवाडे, गोविंद चहांकर,केशवराव पडोळे, विनोद माहुरे,राजू पुडके,मधुकर राजूरकर,स्वप्नील जयपूरकर,मनोज पेंदोर,अफसर अली,धवल घुंगरुड, कुंदन कांबळे,शंकर दातारकर,राजू मोहर्ले,प्रशांत ठाकरे,व्यवस्थापक संजय जुमळे,कर्मचारी गणेश हिवरकर,अवधूत शेराम,रोशन शिरळकर,कुणाल शिरळकर आणि सत्कारीत शेतकरी उपस्थित होते. प्रास्ताविक मिलिंद इंगोले यांनी केले, सूत्रसंचालन राजेंद्र तेलंगे यांनी केले. आभार प्रदर्शन अंकुश मुनेश्वर यांनी मानले.

## आदिवासींच्या विविध प्रश्न व अडचणीसंदर्भात केंद्रीय मंत्री ना. रामदासजी आठवले यांची रायगड जिल्हाध्यक्ष गणपत वारगडा यांनी घेतली भेट..

### केंद्रीय मंत्री ना. रामदास आठवले यांनी तात्काळ आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्याकडे साधला संपर्क

**दैनिक युवक आधार**
**पनवेल/ प्रतिनिधी :**

रायगड जिल्हामध्ये आदिवासी समाजाचे अनेक प्रश्न व अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे आदिवासी समाज विकासापासून वंचित राहिला आहे. आदिवासी समाजाचा विकास व्हावा याकरिता शासनाने आदिवासी विकास विभागाची निर्मिती केली. मात्र, अजून ही आदिवासींचा विकास झालेला नाही. याकरिता अनेकदा आदिवासी संघटनेच्या माध्यमातून शासन दरबारी प्रश्न व अडचणी मांडत असतात. परंतु, अधिकाऱ्यांच्या आश्वासना पलीकडे पारस बद्दल झालेला नाही.

आदिवासी समाजातील प्रश्न व अडचणी मांडण्यासाठी आदिवासी समन्वय समिती रायगड जिल्हाध्यक्ष गणपत वारगडा यांनी खासदार,



केंद्रीय मंत्री, ना. रामदासजी आठवले यांची भेट घेतली. भेटी दरम्यान रायगड जिल्ह्यातील आदिवासी समाज विकासापासून कसा वंचित राहिला आहे, यांची सविस्तर माहिती गणपत वारगडा यांनी केंद्रीय मंत्री ना. रामदासजी आठवले यांना सांगितली. आदिवासी समन्वय समिती रायगडच्या वतीने देण्यात आलेले निवेदन संदर्भात झालेल्या चर्चेत केंद्रीय मंत्री ना. आठवले यांनी सविस्तर माहिती घेऊन लवकरात लवकर प्रश्न सोडविण्यात येथील असे सांगून केंद्रीय मंत्री ना. आठवले यांनी तात्काळ महाराष्ट्र राज्याचे आदिवासी विकास मंत्री ना. अशोक उईके यांच्याकडे संपर्क साधला.

यावेळी रिपब्लिकन पार्टी (आठवले गट) राष्ट्रीय सचिव श्री. बारशिंगे, रायगड जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, पनवेल शहर जिल्हाध्यक्ष प्रभाकर कांबळे, कार्याध्यक्ष तथा प्रशिक एज्युकेशन सोसायटीस चरमन मोहन गायकवाड, मोनेश गायकवाड, नगरसेवक अरविंद सावळेकर, जेष्ठ पत्रकार प्रमोद वाळेकर, आदिवासी समन्वय समिती रायगड जिल्हाध्यक्ष गणपत वारगडा, जिल्हा सदस्य जयवंत शिद, विष्णू खैर, पत्रकार सुनिल वारगडा आदी. उपस्थित होते.

**आदिवासी समन्वय समिती रायगडच्या निवेदनात दिलेले ठराविक मुद्दे :**

१) आदिवासी समाजाची संस्कृती व परंपरा जतन करण्यासाठी प्रत्येक तालुक्यात आदिवासी भवन उभारणे. तसेच युवक/युवतीकरिता प्रशिक्षण अकॅडमी तयार करणे. २) वन आणि दळी जमिनी दावे मंजूर करून ७/१२ उतारा बनवणे.
३) रायगड जिल्ह्यात गाव नमुना १४ अट शीतल करून आदिवासी समाजाला स्थानिक पंचनामा गृहीत धरून जातीचे दाखले देण्यात यावे. ४) रायगड जिल्ह्यात पेसा कायदा लागू करा. ५) ग्रामदान व भुदान समितीच्या जमिनीच्या चौकशी करून आदिवासींना देण्यात यावे. ६) चौक (ता.खालापूर) मोरबे धरण आदिवासी प्रकल्पग्रत यांना वाटप करण्यात आलेले प्लॉट बिगर आदिवासींनी अतिक्रमण केले आहे. ते प्लॉट संबंधित आदिवासींना देण्यात यावे. तसेच बेकायदेशीर घेतलेले आदिवासींचे प्लॉट चौकशी करून अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक कायद्याने गुन्हे दाखल करणे. ७) आदिवासींचे बेकायदेशीर अतिक्रमण व हडप केलेले गावठाण आदिवासींना परत मिळणे.

## पनवेल शहर पोलिसांची वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलांवर धडक कारवाई

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**



पनवेल महानगरपालिका हद्दीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गावर मोठ्या प्रमाणात वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिला वावरत असल्याने त्या परिसरातील इमारतीमधील महिलांना नाहक त्रास होत होता . या संदर्भात त्या भागातील इमारतीमधील रहिवास्यांनी तक्रार सुद्धा पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली असता या तक्रारीची दखल पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी आज त्वरित तेथील दहा महिलांना ताब्यात घेऊन कारवाई केली आहे . या परिसरातील अ.भू.क्र. १९५/१, या मिळकतीतील ओम साई प्रसाद को. ऑप हौसिंग सोसायटीच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. सदर परिसरात वेश्या व्यवसाय करणाऱ्या काही महिला मुद्दाम तेथे इमारतीतील मोकळ्या जागी बसून अश्लील हावभाव करतात. या संदर्भात त्यांना समज देऊनही त्या महिला मुद्दाम तेथे बसत असत. त्यामुळे सदर इमारतीतील रहिवाश्यांना त्याचा खूप त्रास होत आहे. या बाबत परिसरातील नागरिकांनी तक्रार देताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस हवालदार साधना पवार व त्यांच्या पथकाने सदर ठिकाणी जाऊन त्या महिलांना ताब्यात घेत असताना दोघीजणींनी पळून जाण्याचा प्रयत्न केला असता महिला पोलिसांनी त्यांचा पाठलाग करून त्यांना ताब्यात घेतले असून त्यांच्यावर पुढील कारवाई केली आहे